# प्रकरण पहिले

## ग्रामीण कथा; स्वरूप प्रेरणा व वाटचाल

१.१ ग्रामीण कथेचे स्वरूप
१.२ ग्रामीण कथेची प्रेरणा
१.३ ग्रामीण कथेची वाटचाल
अ) स्वातंत्र्यपूर्व कालखंडातील ग्रामीण कथाकार
ब) स्वातंत्र्यप्राप्तीनंतरचे ग्रामीण कथाकार
क) ग्रामीण कथाकारांची तिसरी पिढी
ड) चौथ्या पिढीचे ग्रामीण कथाकार

# प्रस्तावना :

१९७५ नंतर ग्रामीण साहित्य चळवळ सुरू झाली.त्यावेळेचे नागनाथ कोत्तापल्ले एक महत्वाचे साहित्यिक आहेत. स्वातंत्र्योत्तर काळात आपणही आपल्या भावनांना शब्दरूप देऊ शकतो या आत्मविश्वासाने ग्रामीण नवशिक्षित लेखक लिहू लागले. ग्रामीण समाजाची सुख दुखे व्यक्त झाली पाहिजेत या हेतूने आनंद यादव, रा.रं.बोराडे, नागनाथ कोत्तापल्ले, चंद्रकुमार नलगे यांनी या चळवळीला वैचारिक पाठबळ दिले. नागनाथ कोत्तापल्ले यांच्या कथा अलिकडील असल्यामुळे त्यांच्या कथेची समीक्षाही फारशी उपलब्ध नाही. म्हणून प्रस्तुत प्रबंधिकेत नागनाथ कोत्तापल्ले यांच्या कथालेखनाचा अभ्यास करण्यापूर्वी ग्रामीण कथेचे स्वरूप , प्रेरणा, वाटचाल पाहणे योग्य वाटते.

मानवी जीवनात कथा या वाङ्.मय प्रकाराला अत्यंत महत्वपूर्ण स्थान आहे. कारण मानवी जीवनाच्या आरंभापासूनच कथेचा जन्म झाला आहे. आदिम अवस्थेत असलेल्या मानवी समुहात एकत्रित असलेल्या व्यक्तींनी आपल्या जीवनातील अनुभव जेंव्हा दुसऱ्यास सांगण्यास सरूवात केली. त्या अनुभवांचा कथात उद्‌गम आहे. कथा म्हणजे विशिष्ट शैलीमध्ये सांगीतलेली एखादी गोष्ट, हकिकत, अनुभव. आरंभी कथेला दोन अंगे होती ती म्हणजे कथनता आणि कथा श्रवणीयता. सांगणारा कथा सांगत असे आणि ऐकणारा ऐकत असे. ऐकणाऱ्याचे मनोरंजन व्हावे, त्यातून त्याला कोणतातरी बोध व्हावा, आनंद मिळावा तसेच तो कथेशी एकरूप व्हावा यासाठी कथा सांगणारा आपली कथा शैलीत सांगत असे . कथेमध्ये घटना, प्रसंग, व्यक्तिचित्रण आणि निवेदन हे सर्व असते.

शीर्षकानुसार आपल्याला ग्रामीण कथेचा विचार करावयाचा असल्याने ग्रामीण कथा म्हणजे कशाप्रकारच्या हे पाहणे योग्य वाटते. ग्रामीण कथा म्हणजे हा काही वेगळा प्रकार असा नाही दैवतकथा, परीकथा , नितिकथा, बोधकथा या

कथेप्रमाणेच. पण ग्रामीण कथा म्हणजे अज्ञान, रूढीप्रियता, दारिद्रय, मागासलेपणा असे नाही. कारण या सर्व बाबी शहरी जीवनातही सापडू शकतात. हीच लक्षणे ग्रामीणत्वाची होऊ शकत नाहीत तर या पलिकडे ग्रामीणत्वाचे विशेष दिसून येतात. प्रादेशिक साहित्याबद्दल ही असाच संभ्रम दिसून येतो. कारण ग्रामीण आणि प्रादेशिक दोन्ही एकच असे मानले जाते. त्यासाठी प्रथम ग्रामीण कथा म्हणजे नेमक्या कोणत्या? हे पहाण्यासाठी ग्रामीण साहित्य म्हणजे काय? हे पहाणे आवश्यक आहे.

## ग्रामीण साहित्य म्हणजे काय ?

'' ग्रामीण जीवनातून फुलणारे, ग्रामीण वास्तवातून साकार होणारे साहित्य ते ग्रामीण साहित्य ''[१] असे नागनाथ कोत्तापल्ले यांनी म्हटले आहे. '' खेडेगाव तेथील जीवन पद्धती, तेथील अशा रीती, शेती, तेथील निसर्गाशी, मातीशी असलेले मानवी पण प्रदेशनिष्ठ वैशिष्ट्यपूर्ण संबंध, तेथील एकूण संस्कृतीला काही प्रादेशिक वैशिष्ठ्ये, मानवी जीवनाला याच प्रदेशानुसार पडलेल्या आर्थिक, सामाजिक, धार्मिक, ज्ञानविषयक मर्यादा व यातून उद्‌भवणारे प्रश्न आणि समस्या ज्या साहित्यात येतात ते साहित्य म्हणजे ग्रामीण साहित्य ''[२] असे आनंद यादव म्हणतात.

ग्रामीण साहित्य लिहिणारा लेखक जिथे जन्मला, वाढला, पोसला त्या परिसराचा, तिथल्या मातीचा त्याचे व्यक्तिमत्व घडणीवर परिणाम होतो. यापरिणामातून घडलेले लेखकाचे व्यक्तिमत्व आणि लेखनातील प्रतिबिंब याविषयी श्री. मधु कुलकर्णी यांचे मत असे आहे, '' लेखकाचा परिसर हे त्याच्या लेखनाचे एक अविभाज्य अंग होऊन बसते तसा व्यंकटेश माडगुळकरांच्या कथांतील माणदेशाचा परिसर त्यांच्या लेखनाचे एक अंग आहे. ग्रामीण लेखकाच्या लेखनातून तो तो परिसर उत्कटपणे आणि कलात्मक पातळीवरून अविष्कृत झालेला असतो. हे लेखन त्या त्या परिसराशी एकजीव झालेले असते. नागरी जीवनापासून दूर असलेल्या अशा परिसरातील जीवन अविष्कृत करणाऱ्या

साहित्याला ग्रामीण साहित्य म्हटले जाते.''[३]

ग्रामीण साहित्य ही सोयीसाठी वापरावयाची वर्णनपर संज्ञा आहे. ती मुल्यसुचक संज्ञा नाही.

ऐतिहासिक कादंबरी, सामाजिक नाटक या शब्दप्रयोगातून ऐतिहासिक, सामजिक ही विशेषणे केवळ वर्ज्य विषयाचा निर्देश करतात. त्याचप्रमाणे ग्रामीण हे विशेषण विशिष्ट ''ग्रामीण जीवनाचे, मनाचे, चित्रन करणारे साहित्य ते ग्रामीण साहित्य''[४] असे गो.मा. पवार यांनी म्हटले आहे.

ग्रामीण याचा अर्थ ग्रामाचे, ग्रामातील ग्रामविषयकतेचे आणि खेड्याचे, खेड्यातील परिघात, संस्कारात, संस्कारित झालेले खेड्यातील जीवन साहित्यकार साहित्यात मांडत असतात. ग्रामीण साहित्यात निसर्गाला जास्त महत्व असते. उन,वारा, पाऊस, नदी-नाले, झाडे - झुडपे यांच्याशी शेतकऱ्यांचा नित्याचा संबंध असतो. त्याच बरोबर खेड्यातील माणूस हा धार्मिक असतो म्हणून तो काळी आई मानून शेतीची पुजा करतो. सुगीची, अवजारांची तो पुजा करता. त्यामुळे ग्रामीण साहित्यात त्याविषयी अनेक प्रकार आढळून येतात.

## १.१) ग्रामीण कथेचे स्वरूप :-

गोष्टी सांगण्याची आणि गोष्टी ऐकण्याची आवड मानवी मनात फार प्राचीन काळा पासून दिसून येते. लहान असताना आपल्याला आजोबा-आजी गोष्टी सांगत असलेले दिसून येतात आणि हेच संस्कार आपल्यावर होत असतात. देवदिकांच्या, राजा-राणींच्या, पऱ्यांच्या, भुता-राक्षसांच्या अशा वेगवेगळ्या प्रकारच्या गोष्टी सांगितल्या जात. त्या प्रमाणे जसे वय वाढत जाते. तसे शुरविरांच्या रहस्यकथा, गुढकथा अशाप्रकारच्या ऐतिहासिक कथा आपल्याला आवडू लागतात. त्याचप्रमाणे तारूण्यात पदार्पण केल्यानंतर प्रेम विषयक कथा आवडू लागतात. त्याचबरोबर भोवतालचे आयुष्य, माणसांची सुख, दु:खे जाणून घेण्याची प्रवृत्ती वाढू लागते. मग आपण कळत नकळत

कथा वाचण्यात रममाण होतो. मानवाला लेखनकला अवगत होण्यापूर्वी निर्माण झालेले कथा साहित्य हे मौखिक स्वरूपाचे होते. पण कालांतराने ते लिहले जाऊ लागले. एक एक कथा मांडत जात त्याचे कथा संग्रह निर्माण झाले. ऐंशी टक्के लोक खेड्यापाड्यातच राहतात आणि त्यांच्या उपजिविकेचे साधन म्हणजे शेती. या लोकांचे साहित्यात चित्रण करणारा लेखक हा प्रामुख्याने शहरवासी, मध्यवर्गिय असाच होता. भारत हा शेतीप्रधान देश आहे. शहरी जीवनात अनेक वैचारिक चळवळी पहावयास मिळतात म्हणून तेथील संस्कृतीही बदलत्या स्वरूपात पहावयास मिळते. ग्रामीण संस्कृतीही बरीचशी परंपरेशी बद्ध म्हणून स्थिर अशीच असते. त्यामुळे ग्रामीण संस्कृतीत समजुती, संकेत, नितीकल्पना इत्यादी गोष्टी अविचल स्वरूपात पहावयास मिळतात. त्यात ही भारतीय खेड्याचे स्वरूप एकसंघ साचेबंध असे आहे. ग्रामीण संस्कृती ही बारा बलुतेदारांच्या चक्राभोवती फिरते त्यामुळे ग्रामीण कथेतील कथानके या चक्रामुळे उमटलेल्या चाकोरीतून धावताना दिसतात.

ग्रामीण भाग म्हटले की चटकन डोळयासमोर वेगवेगळे भाग तरंगू लागतात. उदा. खेड्यानजीकच वाकडे तिकडे वळणे घेत चाललेली नदी आणि छोटीशी पायवाट, नजीकच असलेले एक मंदीर, दोन्ही बाजूने शेती की जी पाण्यामुळे डोलाने फुलू लागलेली आहे. तेथील कष्ट करणारा तो शेतकरी, राबराब राबतो आणि रत्नासारखे धान्य त्या काळ्या मशागतीतून किंवा पोटातून मिळवितो आणि ते एकटक पहात रहातो. त्याच्यातच तो कष्टाचं सार्थक झालं म्हणून तृप्त होतो. त्याचप्रमाणे त्रि.ना.अत्रे यांनी खेड्याचे रेखाटलेले चित्र, ''खेडे म्हटले की अगोदरच चटकन काळीच डोळ्यापुढे उभी रहाते. शेते, पिके, गवत, झाडे, गुरे-ढोरे, शेळ्या - मेंढ्या, मळा-गोफण वगैरे बळीराजाचे वैभव खेड्याचे नाव काढताच इतके मन व्यापून टाकते की खेड्यात शेतीखेरीज दुसरा रोजगार चालत असेल किंवा शेतकऱ्याखेरीज कुणी रहात असेल असे ऐकाऐकी येत नाही. कुणबी पुढे झाल्याखेरीज एकाही खेड्याची वसाहत झाली नाही. त्याने धान्य पैदा करून इतरांच्या खाण्याची तरतुद केली तेंव्हा इतर गोळा झाले.''[५]

इ.स. १८०० ते १८८५ हा कालखंड मुख्यता इंग्रजी राजवटीचा कालखंड. या कालखंडातच कथावाङ्.मयाची खऱ्या अर्थाने निर्मिती झाली. त्यापूर्वी 'पंचतंत्र'

'हितोपदेशक', 'बृहतकथा', 'वेताळपंचविशी', 'सिंहासन बत्तीशी' असे कथावाड्.मय पहायला मिळतात. या काळात भाषांतरीत म्हणजेच संस्कृत व इंग्रजीतील बोधपर कथांची मराठीत भाषांतरे लिहिण्याचा उत आला होता. चिपळूणकर बापू छत्रे यांनी भाषांतरीत ग्रंथ लिहिले.

ग्रामीण जीवनात ललित वाड्.मयात 'वास्तववादी' काळात प्रथम स्थान दिले जाते ते हरिभाऊ आपटे यांच्या कथांना. समाजजीवन, सुधारणा, स्त्री-पुरूष संबंध, शिक्षण, मागासलेपणा, रूढी, रीती, व तद्नुषंगाने नवे विचार हरीभाऊंनी ललित वाड्.मयात अत्यंत प्रभावीपणे आणले. १८८५ नंतर 'करमणूक' व 'मनोरंजन' या मासिकांचा उदय झाला. या मासिकातून हरीभाऊंच्या कथा प्रकाशित होऊ लागल्या. हरीभाऊकालीन कथेत आटोपशिरपणा, एकसुत्रीपणा, सुचकता इत्यादी कलात्मक अंगे उपेक्षित राहिली. हरीभाऊंच्या याच वास्तवपूर्ण पार्श्वभूमीवर वी.सी. गुर्जरांनी कथा लेखन केले. मध्यमवर्गीय जीवनातील साधे घटनाप्रसंग त्यांनी आपल्या कथेत आणले. गुर्जरांनी कथा लेखन केले. मध्यमवर्गीय जीवनातील सोई घटनाप्रसंग त्यांनी आपल्या कथेत आणले. गुर्जरांनी मराठी कथेला रंजकता बहार करून तिला लोकप्रियता मिळवून दिली.

'काळ तर मोठा कठीण आला' ही स्फुट गोष्ट हरीभाऊंनी लिहिली. ग्रामीण कथेचा उगम म्हणून हीच कथा प्रथम येते. १८९७ च्या दुष्काळावर शेतकऱ्यांची झालेली परिस्थिती यावर त्यांनी लिहिली. यावरील संवाद नागर पद्धतीचे आहेत. यानंतर वि.स.सुखटणकर यांनी 'सह्याद्रीच्या पायथ्याशी' (१९३१)हा आठ कथांचा संग्रह प्रसिद्ध केला. जीवनाकडे वळण्याची त्यांची ही जाणीव तत्कालीन इतर कुठल्याही कथाकारापेक्षा वेगळी होती. गोव्यातील देवदासीची चाल व त्यांची होणारी कुचंबणा शेजारपाजारच्या गावातील वैर, गावकरी आणि गावातील श्रीमंत, वतनदार, भांडणे, परकियांची लाचारी इत्यादी गोष्टी त्यांनी कथेतून मांडल्या आहेत.

१९२० नंतर महाराष्ट्रीय जीवनावर गांधीवादाचा प्रभाव पडला. याच काळात आसपास साम्यवाद, समाजवाद यांचेही लोण भारतात आले. या सर्वांचा परिणाम लेखन

निर्मितीवर झाला. वि.स.सुखटणकरांच्या नंतर लक्ष्मणराव सरदेसाई यांनी 'कल्पवृक्षाच्या छायेत', 'सागराच्या लाटा' 'वादळातील नौका', 'ढासळेलेले बुरूज' इत्यादी वैशिष्ट्यपूर्ण कथासंग्रह लिहिले. सुखटणकरांपेक्षा वेगळ्या प्रकाराचे लेखन त्यांनी केले. त्यांच्या साहित्याची प्रेरणा जीवनातील नाट्य, मानवी स्वभावाचे नमुने, स्त्री-पुरूष संबंध यासारख्या आहेत.

'ढासलेला बुरूज' हा कथासंग्रह १९४० साली प्रसिद्ध झाला. त्याच्या नंतर लगेचच १९४१ साली श्री.म.माटे यांचा 'उपेक्षितांचे अंतरंग' हा कथासंग्रह प्रसिद्ध झाला. यामध्ये ग्रामीण कथांचे धुमारे आणि नव्य जाणिवा पालावल्या. त्यांच्या कथांतून मानवी जीवनातील एक उपेक्षित स्तर दिसून येतो. उपेक्षितांची निरपेक्ष सेवा घडावी यासाठी जी माणसे दिसली ती त्यांनी अस्सलपणे प्रकट केली आहेत. माटे हे एक समाज सुधारक असल्याने समाजातील जी माणसे त्यांना दिसली व जी त्यांना महत्वाची वाटली ती त्यांनी प्रकट केली. आनंद यादव म्हणतात ,त्याप्रमाणे '' श्री. म.माटे यांना 'ग्रामीण कथेचे हरीभाऊ' म्हटले तर ते त्यांच्या लेखनाशी सुसंगत होईल असे वाटते.''[६] त्याचप्रमाणे ठोकळयांनी रानदांडगेपणा, माणसांमाणसातील आणि गावातील हाडवैर, दादागीरी करणारे लोक, सुगी, पिकं, शेतातील नाट्यपूर्णप्रसंग, खेडेगावातील सण-उत्सव, प्रेम-प्रकरणे, भानगडी, भटक्या जमातींचे इत्यादी कथांचे विषय मांडले आहेत.वास्तवापेक्षा अद्भूतता, व्यक्तीपेक्षा घटना, अर्थपूर्णतेपेक्षा कल्पनाजन्य काव्यमयता, नाट्यपूर्णतायांचे त्यांना आकर्षण फार आहे. त्यामुळे त्यांची कथा ग्रामीण वास्तवातून ग्रामीण जीवनदर्शनापासून बाजूला सरते आणि वाचकाच्या मनाची पकड घेते.

र.वा.दिघे, ठोकळ यांचे यशापयश सारख्याच पद्धतीचे आहे. दिघ्यांनी कोकणच्या पार्श्वभूमीवर ग्रामीण कथा लिहिली, तर ठोकळांचे साहित्य हे जीवनदर्शनापेक्षा मनोरंजनात्मक असल्याचे दिसून येते. दिघ्यांचे कथाविश्व व्यापक आहे. खेडेगावच्या जीवनातील प्रश्न त्यांनी कथेद्वारे मांडले आहेत याच काळात वामन चोरघडे, दत्त, रघुनाथ कवठेकर यांनी ग्रामीण कथा लिहिल्या पण ते ग्रामीण कथाकार म्हणून तितकेसे प्रसिद्ध नाहीत. य. गो.जोशी व श्री. कवठेकर यांच्या कौटुंबिक भावना व संबंध यात कथा रमताना दिसतात. कारूण्यावर त्यांचा भर जास्त दिसतो. त्यांनी ग्रामीण

जीवनावर निष्ठा ठेवून कथा लिहिल्या.

ग्रामीण जीवनात सारी सृष्टी मानवी जीवनाइतकीच सजीवत्वाने माणसे हा मध्य बिंदू व त्यांच्या भोवती निर्मिलेले जग अशी स्थिती तेथे नसते. तर या सृष्टीतील इतर घटकां सारखाच एक घटक असतो. त्यामुळे या समाजाचे अनुभवविश्वच पुष्कळसे वेगळे असते. ग्रामीण जीवन माती, सृष्टी, पशु-पक्षी, वनस्पती आणि ऋतुचक्र यात सामावली जाते. शंकर पाटील, आनंद यादव यांच्या कथा वाचल्यास हे म्हणणे लक्षात येते जेंव्हा ग्रामीण जीवनात यंत्रसंस्कृती अवतरते तेंव्हा ग्रामीण भाव-जीवन कसे उद्ध्वस्त होते हे माडगुळकरांच्या 'सर्व्हिस मोटार' या कथेत दिसते.

ग्रामीण जीवनाचे तेथील वैशिष्टयांसह दर्शन वेंकटेश माडगुळकरांच्या ' गावाकडील गोष्टी' पासून झाले. तत्पूर्वी ग्रामीण मराठी कथा सांगेतिक स्वरूपाची होती . त्यात वरील सुखटणकर, ठोकळ, सरदेसाई, माटे यांचा समावेश होतो. निखळ ग्रामीण कथा प्रथम माडगुळकरांनीच लिहिली. तेथील माणूस त्यांचे अंतर्गत मनोव्यापार परिस्थिती जन्य मानसांचे बदलणारे मनोविश्व यांचे दर्शन त्यांच्या कथेतून दिसून येते.

शंकर पाटील, मिरासदार, बाबा बाटील यांनी माडगुळकरांची प्रेरणा घेऊन कथा लेखन केले. यावेळचे म.गो. पाठक. बोराडे, आनंद यादव, उद्धव शेळके, सखा कलाल, हमीद दलवाई, चारूता सागर, महादेव मोरे हे नंतरच्या पीढीतील ग्रामीण कथाकार आपल्याला दिसून येतात. घटनाप्रसंग व व्यक्तीच्या बाह्यचित्रणातुन मानवी अंतरंग व त्याचे विविध व्यापार याचे आंदोलन त्यानी अचूक पद्धतीने टिपले. स्थल परत्वे अधून- मधून ग्रामीण बोलीचा अवलंब केला. जीवनातील दारिद्रय व दैन्याबरोबरच विसंगती व अज्ञान टिपून विनोद निर्मितीकडे लक्ष पुरविले. त्यातुनच बरेचसे किस्से निर्माण झाले.

ग्रामीण जीवन चित्रणातुन अस्सल वास्तवाची अनुभूती येते. त्याचप्रमाणे भोळयाभाबड्या विश्वातील इच्छा, आशा-आकांक्षा, संघर्ष यांची मर्यादित स्वरूपे ही प्रत्ययाला येतात. स्वप्नरंजनाकडे झुकलेल्या मराठी कथेला वास्तवाच्या दिशेने वाटचाल करायला लावून ग्रामीण कथा ही जिवंत अनुभूतीशी प्रामाणिक कशी राहील याची काळजी

वाहिलेली जाणवते. शंकर पाटील यांनी ग्रामीण कथा लिहिली त्यात त्यांचा ओढा भाववृत्तीच्या रेखाटनाकडे अधिक दिसतो. खेडूताचे वागणे, बोलणे, चालणे,स्वभाव, संथ तसेच हिकमती व्यवहार त्यांचे चावट , वात्रट आणि प्रसंगी वायफळ किस्से यांचा अस्सल तपशिल त्यांच्या कथातून दिसतो.

उद्धव शेळकेंच्या पात्रांना सुधारणेचा फारसा स्पर्श नाही. दारिद्रय , अपमान, आर्थिकतेने ती पीचलेली आहेत. कोणत्याही मर्यादित जीवन सृष्टीचा स्विकार न करणारी शेळक्यांची साहित्यदृष्टी आहे. विदर्भातल्या निन्मस्थरातील माणसाकडे गंभीरपणे पाहून त्यावर फारसे भाष्य न करता भेदक नजरेने सामाजिक व आर्थिक दु:खे धरण्याकडे त्यांचा कल असल्याचे जाणवते . त्यामुळे त्यांची कथा गंभीरतेचा सुर आळवते. अशा अनेक ग्रामीण कथा कारांचा अभ्यास वैयक्तीक पध्दतीने मांडावयाचा असल्याने त्याचे परिक्षण पुरे करता येईल.

ग्रामीण कथेचे स्वरूप पहात असताना कथा म्हणजे नेमके काय? तर कथा या वाङ्.मय प्रकाराचा जेंव्हा स्वतंत्र विचार होऊ लागला तेंव्हा भिन्न भिन्न वैशिष्ठ्ये लक्षात घेऊन अनेकांनी कथेची व्याख्या करण्याचा प्रयत्न केला आहे.

कथेच्या व्याख्या:

१) '' टाळ, मृदंग वीणा इत्यांदीच्या सहाय्याने देवदिकांच्या गोष्टी परमार्थ समुदयात सांगणे '' [७]

२) '' कमीतकमी पात्र आणि कमीतकमी प्रसंग वापरून थोड्या वेळात परिणामकारक रीतीने सांगीतलेली व ऐकणाऱ्याच्या मनावर एकच एक ठसा उमटविणारी हकिकत म्हणजे कथा होय.''[८] अशी ना.सी. फडके यांनी कथेची व्याख्या केली आहे.

३) हडसनची व्याख्या :

" A short story must contain one and only one informing idea and that is the ides must be worked out to it's logical conclusion with abosolute singleness of aim and directness of method." [9]

४) वेल्सची व्याख्या :

" Any piece of small fiction which can be read in twenty minutes would be a short story "[10]

५) क्लेटन हॅमील्टन :

" The aim of short story is to produce single narrative effect with the greatest economy of means, that is consistent with the utmost emphasis" [11].

६) जयशंकर प्रसाद :

'' अख्यायिकामें सौंदर्य की झलक का रस है। मान लिजीये आप किसी तेज सवारीसे चले जा रहे है। रास्ते मे एक गोलमटोल शिशू खेल रहा है उसकी सुंदरता की झलकही इतनी होती है की उसकी स्थायी रेखा आपके पर अंकित हो जाती है । यही काम कहानी भी करती है।'' [१२]

७) चंद्रगुप्त विद्यालंकार :

'' घटनात्मक इकहरे चित्रण का नाम कहानी है और साहित्य के सभी अंगो के समान रस इसका गुण है।'' [१३]

८) ललित प्रसाद सुकूल :

'' कहानी घटना या चरित्र विशेषका संक्षिप्त रसयुक्त चित्रण है।''[१४]

९) प्रेमचंद

'' कहानी (गल्प) एक रचना है जिसमें जीवन के लिये एक अंग या किसी मनोभाव को प्रदर्शित करना ही लेखक का उद्देश रहता है। ... उपन्यास के भांती उसमें मानवजीवन का संपूर्ण तथा बृहद् रूप दिखाने का प्रयास नही किया जाता । उद्यान नहीं

जीस भांती के फुल बेल बुटे सजे हुये है बल्की एक अैसा गमला है जिसमें एक ही पौधे का माधुर्य अपने समुन्नत रूप में दृष्टीगोचर होता है ।''[१५]

अशा कथेच्या व्याख्या मराठी, हिंदी, व इंग्रजी साहित्यकारांनी मांडल्या आहेत. या व्याख्यांच्याद्वारे कथेच्या रूपाची कल्पना येऊ शकते. तरीसुद्धा कथेची व्याख्या सर्वांग परिपूर्ण सांगणे कठीण आहे. कथेच्या संदर्भात कुलकर्णी म्हणतात ,'' कथा हे समग्र वाड्.मयाचे सर्वाधिक स्वाभाविक असे स्वरूप आहे व त्यामुळेच ते स्वयंभू, आकर्षक आणि सुंदर रूप आहे. '' [१६]

## १.२) ग्रामीण कथेच्या प्रेरणा :

ग्रामीण कथेचा विचार करताना ' ग्रामीणता' आणि' प्रादेशिकता' या संकल्पनांचा विचार क्रमप्राप्तच ठरतो. सुरूवातीच्या काळात ग्रामीण साहित्य हे प्रादेशिक साहित्य या नावानेही ओळखले जात असे. तरी ग्रामीण आणि प्रादेशिक या मध्ये मुलभूत फरक केला जातो. आनंद यादव म्हणतात त्या प्रमाणे,'' प्रादेशिक वाड्.मय म्हणजे एखाद्या प्रदेशातील लोकजीवन तेथील संस्कृती त्या प्रदेशाशी निगडीत असल्याने त्या संदर्भात निर्माण झालेल्या काही समस्या , काही जीवन संकेत व रिती यांचे, तेथील लोकांच्या समूहाचे ज्या वाड्.मयात चित्रण होते ते वाड्.मय.'' [१७] पण प्रादेशिक वाड्.मयात त्या प्रदेशातील शहरी जीवनाचे चित्रण येऊ नये असे आपल्याला वाटत असले तरी ' प्रादेशिक' म्हटल्यावर त्या प्रदेशाचे चित्रण हे साहित्यात येणारच पण ग्रामीण साहित्यात ग्रामीण जीवनाचे चित्रण येते. त्यामुळे अनेक समीक्षकांनी प्रादेशिक साहित्याला ग्रामीण साहित्य म्हणणे योग्य नाही असे म्हटले आहे. दोन्हीतही माणसे आणि समस्या सारख्याच धर्तीच्या असतात पण सूक्ष्म रितीने पाहता असे आढळते की ग्रामीण साहित्यात झगडा, झुंज किंवा लढाई आढळते ती दैवाशी, दैववादाशी श्रद्धाळू वृत्तीने जगणाऱ्या जीवनाशी तर प्रादेशिकतेमध्ये हे सर्व असतेच शिवाय तेथे झगडा दाखविण्यात येतो, तो प्राय:नियतीशी प्रादेशिक वाड्.मयात त्या प्रदेशातील 'ग्राम' विभागाचेच समुहदर्शन अभिप्रेत असते आणि ग्रामीण वाड्.मयात त्या त्या ग्राम विभागातील व्यक्तिनिष्ठ जीवन अभिप्रेत असते.

पेंडसे, दांडेकर यांच्या कोकणचे जीवनचित्रण करणाऱ्या कादंबऱ्या आणि माडगुळकरांच्या 'बनगरवाडी' मुळे 'प्रादेशिक' हा शब्द पुढे आला. ग्रामीण साहित्यात निसर्गाचा विचार होतो आणि तोच त्यांच्या सुख- दु:खाचा साथीदार बनून राहतो. पण प्राय: ठसकेबाज वर्णनासाठी ठोकळबाज पद्धतीने तो येतो. काही ठिकाणी त्याचे स्वरूप बटबटीत होते. खरे तर ग्रामीण आणि प्रादेशिकतेचे विभाजन करणे तसे अवघड आहे. असे असले तरी 'प्रादेशिक वाङ्.मय' अगर 'ग्रामीण वाङ्.मय' या वेगवेगळ्या नावाखाली ते त्यावेळी ओळखले जात नव्हते. या संदर्भात आनंद यादव म्हणतात, ''ग्रामीण वाङ्.मयाची वेगळी प्रेरणा घेऊन ते जन्माला आले नव्हते. ग्रामीण जीवन हे वेगळे जीवन आहे ही जाणीवही त्या पाठीमागे दिसत नाही. जीवनातील अनेक समस्यावर व वस्तुस्थितीवर भर देऊन जसे इतर वाङ्.मय जन्माला येत होते, त्याच सर्वसाधारण प्रेरणेतून हे वाङ्.मय जन्माला आले होते.''[१८]

१९४५ नंतरच्या काळामध्ये साहित्यात काही बदल झाले वेगवेगळे प्रवाह आले ग्रामीण साहित्य चळवळीने ग्रामीण तरूणांच्या मनाला सृजनशिल, संवेदनशील, अंतर्मुख केले, आत्मभान दिले. कारण समाजात साहित्य निर्माण करणारी पिढी विशिष्ट संस्कारांनी संस्कारित झालेली विशिष्ट पिढी होती. ते उच्चवर्गातील, मध्यवर्गातील पांढरपेशा शहरीजीवनाचे चित्रण करीत व त्यांचे साहित्य हेच खरे जीवन चित्रित करणारे साहित्य असा समज होता.

दलित साहित्याच्यानंतर ग्रामीण साहित्याची चळवळ निर्माण झाली. ती एकाएकी निर्माण झाली नाही, प्रथम ग्रामीण साहित्याची बिजे दिसतात ती महात्मा फुले यांच्या 'शेतकऱ्याचा असूड' (१८८३) यामध्ये यात शेतकऱ्यांच्या दु:स्थितीचे वर्णन केले असून हा वैचारिक स्वरूपाचा ग्रंथ आहे. त्यामध्ये अनेक ठिकाणी लालित्य प्राप्त झाले आहे. शेतकऱ्यांच्या कुटुंबाची दुरावस्था वर्णन करताना फुल्यांच्या लेखणीला चित्रवाण लाभतो. त्यांच्या लेखणीला आक्रमकपणा आहे. अनेक ठिकाणी त्यांच्या विवेचनाला उपहास, उपरोध यांची तीव्र धार आलेली आहे. फुल्यांना शेतकऱ्यांच्या हिताची तळमळ आहे. त्यानंतरचे कृष्णराव भालेराव हे महात्मा फुले यांच्या अनुयायांच्यापैकी एक यांनी १८८८ मध्ये 'बळीबा पाटील' व '१८५७ चा दुष्काळ' या दोन कादंबऱ्या प्रसिद्ध केल्या.

यामध्ये शेतकऱ्यांचे जीवन व शेतीचे त्रोटक वर्णन केले आहे.

हरीभाऊंचा 'काळ तर मोठा कठीण आला' (१८९८) यात दुष्काळामुळे एका शेतकऱ्याच्या कुटुंबाची आणि घरादाराची कशी वाताहत झाली याचे चित्रण आहे तर धनुर्धारी यांची 'पिराजी पाटील' (१९०३) या मध्ये अज्ञानी, दरिद्री, धर्मभोळ्या कष्टकरी ग्रामीण माणसांच्या लुबाडणूकीचे चित्र रेखाटले आहे. या दोन्ही कृतींना ग्रामीण साहित्यिक 'ग्रामीण साहित्य'म्हणावयास तयार नाहीत कारण या दोन्ही कृतीमागील प्रेरणा म्हणजे केवळ मानवतेच्या पातळीवरून वाटणारी अनुकंपा हीच होय. कारण त्या काळी महात्मा फुल्यांची सत्यशोधक चळवळ सोडली तर ग्रामीण जनतेसाठी सुधारणा घडवून आणू शकतील असे समाजसुधारकच नव्हते. कारण जे सुधारक होते ते पांढरपेशा वर्गातील व उच्चवर्णीय शहरातून राहणारे होते. लेखकही याच स्तरातील होत. त्यांचा प्रवेश मर्यादित होता, विशिष्ट होता. त्यांच्या समस्याही उच्चवर्णीय पांढरपेशा समाजाच्या होत्या त्यामुळे तत्कालिन साहित्यात तेवढेच प्रतिबिंबीत होते.

१९२० नंतर राजकिय परिस्थितीत झालेल्या स्थित्यंतराचा परिणाम सामाजिक दृष्टीवरही झाला. टिळकयुगाचा अंत झाला होता. महात्मा गांधीचा प्रभाव पडू लागलेला होता.. गांधीजीची दृष्टी राजकारणासह सर्व जीवनाला व्यापणारी होती. त्याचवेळी साम्यवाद, समाजवादी दृष्टीचेही आगमन होऊन त्यांचे मंथन सुरू झाले. गांधीजींनी खेड्यांचे भारतीय जीवनातील स्थान नव्या जाणिवेसह पटवून दिले या सर्वांचा परिणाम साहित्यावर झाला आणि तसे होणेही अपरिहार्य होते. कारण तेवढी शक्ती त्यांच्या शब्दांशब्दामध्ये होती.

महात्मा गांधीनी भारत हा खेड्यांचा देश आहे, अधिकांश जनता खेड्यात रहाते म्हणून खेड्यातील लोकांचे जीवन उन्नत झाले पाहिजे, छोटे उद्योगधंदे सुधारले पाहिजेत त्यासाठी एकूण माणसातच जागृती झाली पाहिजे यासाठी 'चला खेड्याकडे' असा आदेश दिला. या आदेशानुसार ग्रामीण जनतेला आत्मभान देण्याचे प्रयत्न सुरू झाले. त्यामुळे ग्रामोध्दाराचे वातावरण निर्माण झाले. सर्व साहित्यिकांची दृष्टी खेडयाकडे वळली. आपले खरे भारतीय जीवन खेड्यात आहे. तेथील लोकांचा उद्धार झाला

पाहिजे. त्यांच्या जीवनातील विषमता, दारिद्रय, अज्ञान, परंपराप्रियता नाहिशी झाली पाहिजे. त्यांच्याविषयीचा त्यांचा अभिमान जागृत करून त्यांना स्वातंत्र्य सन्मुख केले पाहिजे. समानतेच्या भूमिकेवरून वागवले पाहिजे तेथे समाजसुधारणा व समाजोध्दार करावयाला भरपूर वाव आहे. अशा प्रकारच्या सामाजिक आणि राजकीय जाणिवांनी 'प्रादेशिक साहित्य' या नावानिशी या काळात ग्रामीण वाङ्.मय निर्माण होऊ लागले. खेडे, खेड्याचा परिसर, निसर्ग यांचे दर्शन घडवून नाविन्याचा प्रत्यय देत वाचकांचे कुतुहल जागविणारा लेखक वर्ग निर्माण झाला. ग्रामजीवनातील त्याच्या समस्या निराकरणाचे उपाय व अंदाज बांधून लेखन करावयास प्रारंभ झाला. वि.स.सुखठणकर, लक्ष्मणराव सरदेसाई यांच्या काळातील आरंभीच्या कथा वाचू लागल्यावर किंवा ना.वि.कुलकर्णी, रामतनय, भा.वी. वरेरकर यांच्या याच काळातील ग्रामीण जीवनावरील कादंबऱ्या वाचत असताना वर निर्दिष्ट केलेल्या प्रेरणांचा त्यांच्या साहित्यावर प्रभाव असल्याचे स्पष्ट दिसून येते.

१९४०-४५ च्या काळात काही ग्रामीण लेखकांच्या दृष्टीने नेमक्या उलट्या दिशेने बदल झालेला दिसतो. श्री.म.माटे यांनी प्रथम ग्रामीण जीवन जवळून प्रत्यक्ष अनुभवले म्हणूनच आनंद यादव त्यांना 'ग्रामीण साहित्याचे हरीभाऊ' म्हणतात. ग्रामीण जीवनातील प्रत्यक्षातील समस्या, रोजच्या जीवनातील छळणारे प्रश्न, हरघडी नडणारे दारिद्र्य आणि अज्ञान तरीही दिसून येणारी माणूसकी हे सर्व त्यांनी पाहिले. माटे यांचे साहित्य अस्सलपणाचे एक वेगळेच तेज घेऊन आले होते.

माटे यांच्या साहित्याचा परिणाम त्यांचे समकालीन साहित्यिक ठोकळ - दिघे यांच्या साहित्यावर जाणवतो. त्यांचे ग्रामीण साहित्य विपुल आहे. अद्‌भुतता, काव्यमयता, कल्पकता, निसर्गवर्णन, ग्रामसुधारणा यांचीही जोड त्यांनी आपापल्या व्यक्तिमत्वानुसार आपल्या फडके वळणाच्या साहित्याला दिली आहे. या काळात ग्रामीण साहित्याला दोन दिशा लाभल्या. एक वास्तववादी आणि दुसरी मनोरंजनवादी. कित्येकवेळा इंग्रजीतील ग्रामीण वाङ्.मयात दिसून येणारे ग्रामजीवन आणि तेथील व्यक्तींच्या भावभावना मराठी कथेत ठोकळांनी आणलेल्या दिसून येतात. त्यामुळे त्यांच्या बऱ्याच कथांतून ग्रामजीवनदर्शन बाजूला पडले असून मनोरंजनवादी नवा बदल हीच त्यांची प्रेरणा असलेली दिसून येते.     १४

१९४५ ते १९५० च्या आसपास श्री.ना.पेंडसे, गो.नी.दांडेकर यांनी ग्रामीण जीवनातील कथा, कादंबऱ्या लक्ष वेधतील अशा पद्धतीने लिहिल्या. त्याच्या साहित्यात त्या जीवनातील एकूण समस्या,सामुदायिक स्वरूपाचे लहान मोठे तणाव, निसर्ग, ग्रामीण भाषेची धारणा यांचा अनुभव कसदारपणे व्यक्त झालेला आहे. ते दोघे साहित्यिक खांडेकरी वळणाचे वाटतात. त्याचबरोबर १९५० ते १९५५ च्या दरम्यान व्यंकटेश माडगुळरांनी ग्रामीण कथा लिहिल्या. अंतर्मुख आणि आत्मनिष्ठ, शुद्ध कलावादी प्रेरणेने अनेक कवी आणि कथाकार साहित्य निर्माण करू लागले. कथा क्षेत्रात गंगाधर गाडगीळ, गोखले, भावे, नव्या प्रेरणेने त्यांनी कथा लिहिल्या. या चारही कथाकारांची साहित्यविषयक मुलभूत प्रेरणा कलात्मक वाटते.

मिरासदार १९५० - ५१ मध्ये ग्रामीण कथा लिहू लागले. विनोद हिच त्यांची एकमेव प्रेरणा होती. मिरासदार जीवनातील विसंगती, विरोध, अद्‌भुतता, बढाईखोर वृत्ती, वैचित्र्य, जगावेगळेपणा, भित्रटपणा, कावेबाजपणा असेच गुण त्यांच्या कथेत दिसून येतात. माडगुळकर व मिरासदार यांच्याबरोबर शंकर पाटील हे नव्या दमाचे आणि वेगळया ताकदीचे कथाकार पुढे आले. पाटलांची कथा व्यापक सखोल व सूक्ष्मतेकडे झुकलेली दिसून येते. मानवी मनातील ताण आणि आंदोलने जेथे आहेत तेथूनच कित्येक वेळेला मिरासदार आपल्या कथेला सुरूवात करतात आणि ताण आणि आंदोलने कशी निर्माण झाली हे कथेद्वारे सांगतात.

यांच्याबरोबरीनेच ग्रामीण साहित्याच्या क्षेत्रात लेखन करणारे म.भा.भोसले, ग.दि.माडगुळकर, सराजिनी बाबर, रणजित देसाई, उद्धव शेळके, मिरासदार, पाटील हे लिहित होते. याशिवाय अण्णाभाऊ साठे, शंकरराव खरात, बाबा पाटील, नामदेव व्हटकर, हमीद दलवाई, मधु मंगेश कर्णीक, द.का. हसमनीस, रा.रं.बोराडे, चंद्रकांत भालेराव, बा.भ. पाटील, आनंद यादव, चंद्रकुमार नलगे, महादेव मोरे, सखा कलाल, चारूता सागर, नागनाथ कोत्तापल्ले यांची नावे येतात. त्यांच्या कथातून आजच्या ग्रामीण समाजाचे निकडीचे प्रश्न आणि ग्रामीण भागातील राजकारण, ग्रामीण माणसाचे अपेक्षाभंगाचे दु:ख, तरूण ग्रामीण मनाचा उद्रेक व्यक्त केलेला आहे.

याशिवाय पूरूषोत्तम बोरकर, राजन गवस, गणेश आवरे, विश्वास पाटील, इंद्रजित भालेराव, रामचंद्र पठारे इत्यादी नव्या दमाचे दमदार ग्रामीण साहित्यिक आपल्याला लेखनाद्वारे ग्रामीण साहित्याची भूमी संपन्न करीत आहेत. आजचे ग्रामीण साहित्य अनेक लहान मोठ्या मोहातून मुक्त होऊन कलात्मकतेच्या दिशेने ते अधिक जागरूकतेने वाटचाल करताना दिसते.

एकंदरीत ग्रामीण साहित्याचा इतिहास साकल्याने अभ्यास केल्यानंतर त्यामागे वास्तववादाची प्रेरणा कार्यरत होती असे दिसून येते. कधी ही प्रेरणा सबल झालेली दिसत असेलही पण त्यास इतर घटक कारणीभूत आहेत. ग्रामीण जीवनाच्या स्थितीगतीचा शोध घेण्याच्या हेतूने कथा लिहिल्या गेल्या तर काही आजच्या ग्रामीण कथा ह्या लहान मोठ्या मोहातून मुक्त होऊन कलात्मकतेच्या दिशेने अधिक जागरूकतेने वाटचाल करताना दिसतात. साहित्य लिहिण्यामागे कोणती ना कोणती प्रेरणा असतेच जसे मर्ढेकरांनी नवकाव्य बरोबरच साहित्याच्या स्वरूपाचा विचार कलात्मकतेच्या दिशेने नव्याने मांडला या विचारांचा परिणाम प्रत्याक्षाप्रत्यक्ष त्यांच्या आसपासच्या पिढीवर प्रभावीपणे झाला. अंतमुर्ख आणि शुद्ध कलावादी प्रेरणेने कथाकार साहित्य लिहू लागले. कथाकारांना एकाच प्रकारची प्रेरणा मिळाली तरी अनुभव घेण्याची पातळी ते व्यक्त करण्याची पद्धती आणि एकूण व्यक्तिमत्व ही वेगवेगळी असू शकतात.

अनेक प्रेरणांनी प्रेरीत होऊन साहित्यिक साहित्य लिहित असतो पण त्यामागे नेमकी कोणती प्रेरणा असते याची जाणीव नसते. या संदर्भात स्वत:च्या साहित्य निर्मिती मागील प्रेरणेसंदर्भात आनंद यादव म्हणतात " 'मी का जगतो'? या प्रश्नाचे उत्तर देणे जितके कठीण आहे, तितकेच 'मी का लिहितो ?' या प्रश्नाचे उत्तर देणे कठीण वाटते. कारण लिहिणे हा साहित्यिकाच्या जगण्याचाच एक भाग होऊन बसलेला असतो. जगण्यामागची एकच प्रेरणा ठामपणे जशी सांगता येत नाही तशी लिहिण्यामागची एकच प्रेरणा ठामपणे सांगता येत नाही." [१९]

## १.३) मराठी ग्रामीण कथेची वाटचाल :

मराठीमध्ये 'ग्रामीण कथा' या नावाखाली एका विशिष्ट प्रकारची ग्रामीण कथा

लिहिली जाऊ लागली पण याचा वेगळा उच्चार करण्यापूर्वी काही विशिष्ट अशी पार्श्वभूमी समजावून घेणे आवश्यक आहे. ग्रामीण जीवनाचे, मनाचे चित्रण करणारे ग्रामीण साहित्य असे आपण म्हणतो पण फक्त एखादे मन व तत्त्वसंबद्धीची घटना घेऊन ग्रामीण जीवन केवळ पार्श्वभूमीला ठेवून लिहिलेली कथा अस्सल ग्रामीण कथा होऊ शकणार नाही. ग्रामीण कथेला खरेखुरे ग्रामीणत्व प्राप्त होते. ग्रामीण कथा म्हणून कलात्मकता प्राप्त होऊ शकते याचे वैशिष्ठ्य कोणते हे स्पष्ट करताना गो.मा.पवार यांनी संवेदनशीलतेचा विचार मांडला आहे. ते म्हणतात, " एखाद्या लेखकाच्या लेखनाला वैशिष्ठ्य प्राप्त होते ते त्याच्या व्यक्तिमत्वामुळे हा लेखक कोणत्या वातावरणात वाढतो, कोणते संस्कार ग्रहण करतो यावर त्याच्या व्यक्तिमत्वाची जडणघडण अवलंबून असते. त्याचे व्यक्तिमत्व कसे आहे यावर त्याची अनुभव घेण्याची क्षमता व धाटणी ठरत असते. अनुभव घेण्याच्या त्याच्या या क्षमतेला आणि धाटणीला आपण लेखकाची संवेदनशीलता म्हणतो. जो लेखक ग्रामीण जीवनात वाढला, घडला असेल, ज्याने ग्रामीण जीवनाचा गाभा आत्मसात केला असेल त्याचे संवेदनशीलता ही ग्रामीण संवेदनशीलता म्हणता येईल." [२०]

ग्रामीण जीवनाचे तेथील वैशिष्ठ्यांसह एकसंघ दर्शन घडविणाऱ्या कथेला खरी सुरवात व्यंकटेश माडगुळकरांच्या गावाकडील गोष्ट पासून झाली. तत्पूर्वीच्या ग्रामीण मराठी कथा या सांकेतिक स्वरूपाच्या होत्या. निखळ ग्रामीण कथा प्रथम माडगुळकरांनीच लिहिली मात्र ग्रामीण कथेचे मुळ रूपबंध हरीभाऊ आपट्यांच्या 'काळ तर मोठा कठीण आला' या स्फूट गोष्टीत आढळते. हरिभाऊ आपटे यांची कथा मराठी कथेच्या जडणघडणीचा टप्पा असल्यामुळे कथेची स्थिती-गती शोधताना हरिभाऊंच्या कथा पाहणे योग्य आहे.

## अ) स्वातंत्र्यपूर्व कालखंडातील ग्रामीण कथाकार :

### हरिभाऊ आपटे :

हरिभाऊ कथाकार म्हणून नव्हे तर सामाजिक, ऐतिहासिक, कादंबरीकार म्हणून ओळखले जातात. तरीपण त्यांच्या 'स्फूटगोष्टी' ने ठसा उमटविला आहे. 'काळ तर मोठा कठीण आहे' ही कथा १८९७ ला महाराष्ट्रात दुष्काळ पडला त्यावर लिहिलेली

आहे. हरिभाऊ हे काही ग्रामीण जीवनाचे अविभाज्य अंग असलेले लेखक नव्हते. त्यांनी ग्रामीण प्रदेश, ग्रामीण जीवन, ग्रामीण वातावरण, ग्रामीण माणूस रंगवायच्या हेतूने त्याच्या हातून ही कथा लिहिली गेली नाही. ग्रामीण जीवनाचे चित्रण आपल्या कथांतून चित्रित करावयाचे आहे अशी त्यांची भूमिका नव्हती. "ही स्फुटगोष्ट एक वाड्.मयीन अपघात वाटते. ग्रामीण जीवनाच्या खास जाणिवा घेवून ती जन्माला आलेली नाही केवळ आज ग्रामीण वाड्.मयाला विपुलतेमुळे त्याच्या जन्माचा शोध घेत भूतकाळात जाताना ती एक खुण दिसते एवढेच"[२१] त्यांच्या या कथेत दुष्काळामुळे एका शेतकऱ्याच्या कुटुंबाची आणि घरादाराची कशी वाताहात होते याचे चित्रण केले आहे.

हरिभाऊंपाशी विशाल मानवतावादी दृष्टी होती. त्यामुळे जीवनातील विविध दु:खे त्यांच्या चिंतनाचा विषय बनली. 'डेक्कन सभे' च्या कागदपत्रात दुष्काळामुळे शेतकऱ्यांच्या झालेल्या वाताहतीची माहिती त्यांनी वाचली व त्यावर त्यांनी ही कथा लिहिली. रामजी धायगुडे यांचे सहानुभूतीपूर्वक चित्रण तसेच दुष्काळपिढ़ीत जनतेचे दु:ख हृदयाला पिळ पाडू शकेल असा स्पष्ट हेतू त्यांच्या लेखनामागे आहे अशाप्रकारचे ग्रामीण कथेचे पुसट रूप दिसून येते. तरीदेखील ग्रामीण जीवनाचा स्पर्श करणारी ही कथा आद्य मराठी ग्रामीण कथा मानण्यास हरकत नाही. यासंदर्भात चंद्रकुमार नलगे म्हणतात, " ग्रामीण मराठी कथेची पायरी खालची पायरी असे तिचे दर्शन आहे तरीही तिचे महत्व नामदेवांच्या पायरीप्रमाणे आहे हे मानावेच लागेल."[२२]

## वि.स. सुखटणकर

ग्रामीण जीवनाविषयीच्या वाड्.मयीन जाणिवा मराठी साहित्यात सुखटणकरांनी निर्माण केल्या. ग्रामीण जीवनातील वाड्.मयीन जाणिवा १९३१ साली 'सह्याद्रीच्या पायथ्याशी' या ग्रामीण कथासंग्रहात उमटल्या. तत्कालीन गोमांतकीय ग्रामीण जीवनाचे चित्रण या कथांतून दिसून येते. हा आठ प्रादेशिक कथांचा संग्रह लेखनाला १९२६-२८ पासूनच सुरवात केली होती. यामध्ये गोव्यातील जीवन त्यांनी जवळून पाहिलेले असल्यामुळे या जीवनातील ज्वलंत प्रश्न त्यांनी वाचकांच्या निदर्शनास आणून दिले. श्रीमंत वतनदार यांच्या हव्यासापोटी सामान्य ग्रामीणांची होणारी कुचंबणा,

परकियांची गुलामगीरी पत्करण्यात धन्यता होणारी स्वाभिमानशुन्य प्रवृत्तीची माणसे, शेजाऱ्यापाजाऱ्याशी मतभेद, भांडणे, तत्कालीन रूढीप्रिय ग्रामीण समाज, देवदासींच्या प्रथा त्यानी आपल्या कथेतून मांडल्या.

गोव्यातील निसर्गसमृद्ध भूमी, तेथील जीवन, संस्कृती यांचे अनुमान त्यांच्या कथेवरून काढता येते. हा परिसर उभा करण्याची त्यांची प्रेरणा साम्यवादी, देशप्रेमाची व स्वतंत्रतेची आहे हे विसरता येत नाही. १९२० नंतर गांधीयुग सुरू झाले होते त्यामुळे गांधीजींच्या विचारांचा प्रभाव त्यांच्यावर पडला होता. याचा परिणाम म्हणून वाड्.मयातून सुधारणावादाचे वारे वाहू लागले. हा प्रादेशिक चित्रणाचा उल्लेखनीय प्रयत्न त्यांनी केला. ख्रिस्ती आणि हिंदू यांच्यातील निर्माण झालेले तणाव, शेतकरी आणि जमीनदारांच्यात असणारी कुरकुरी अशा अनेक प्रवृत्तीवर प्रकाश टाकण्याचे काम सुखटणकरांनी केले. '' कथेतील योगायोगांची गर्दी कधी आदर्शाच्या आत्यंतिक टोकाचे चित्रण या कथेत येत असले तरीही ग्रामीण जीवनाचा सांगाडा त्यात सापडतो आणि माणसांच्या प्रवृत्ती त्यात कळतात.'' [२३] गोमांतकीय सामाजिक जीवनामागे असलेल्या काही घटकांचे व प्रवृत्तीचे दर्शन सुखठणकर कथेच्या माध्यमातून प्रयत्नपूर्वकतेने घडवतात व ते करताना प्रादेशिक वातावरणाची जोड त्याला देतात.

## लक्ष्मणराव सरदेसाई :

मराठीतील प्रादेशिक कथा गोमंतकांच्या जीवनावरील आहेत. यात प्रामुख्याने उल्लेख सरदेसाई व सुखटणकर यांचा येतो. 'कल्पवृक्षाच्या छायेत', ' सागराच्या लाटा' , 'वादळातील नौका', 'ढासळलेला बुरूज' इत्यादी कथासंग्रहातून प्रादेशिकता टिपण्याचा प्रयत्न केला आहे. सरदेसाई यांनी निसर्गाला आपल्या कथेत गुंफून टाकले आहे. एखादी घटना सांगण्याऐवजी स्त्री-पुरूषांच्या स्वभावाचे ते जे चित्रण घडवितात ते अत्यंत वैशिष्ठ्यपूर्ण आहे. जीवनातील नाट्य, मानवीस्वभावाचे नमूने, स्त्री-पुरूष संबंध या सारखी लेखनातील वैशिष्ठ्ये त्यांच्या ' मोडलेले माड', 'जरीचे पातळ' इत्यादी कथांमध्ये दिसून येते. 'ढासळलेला बुरूज' मधील लाडू बाबा किंवा 'मोडलेले माड' मधील बाबासाहेब या व्यक्तिरेखा प्रभावी आहे. तसेच त्यांच्या कथांतून रंगविलेले

प्रणयांचे प्रकार क्वचित उत्तान व उन्मादक वाटतात. उदा. ' अनीतेचे दिव्य' मधील अनीतेच्या प्रियकराच्या प्रेमासाठी अर्धनग्नावस्थेत डोक्यावर दगड घेऊन बांधकाम चाललेल्या इमारतीच्या तीन शिड्या चढून जाण्याचा अचाटपणा व प्रियकराबद्दल भ्रमनिरास होताच तिसऱ्या मजल्यावरून उडी घेण्याचा त्याच तोडीचा प्रकार हे सर्व स्त्री-पुरूषांच्या जीवनातील मोहाचे प्रसंग ते शृंगारिक पध्दतीने रेखाटतात.

गोमांतकीय सृष्टी सौंदर्य, तेथील दारीद्र्य, प्रणय, देवदासीसारख्या अनिष्ट चाली व तेथील संस्कृती इत्यादीचे वर्णन ते कुशलतेने करतात. सुखटणकरांनी दाखवलेली कथेची दिशा सरदेसायांनी विस्तारली व लेखनात सातत्य ठेवले. यांच्या साहित्याच्या संदर्भात आनंद यादव सांगतात, '' सरदेसाई यांच्या साऱ्याच कथांतून सुखठणकरांपेक्षा तुलनेने अधिक वाङ्.मयीनता दिसून येते. त्यांच्यामध्ये निर्मितीवेळी बाह्य घटक कार्य करताना दिसत असले तरी ते सुखटणकरांच्या तुलनेने क्षीण वाटतात. हा फरक म्हणजे प्रादेशिक जीवनानुभवांनी निकोप वाङ्.मयाकडे मोहरा वळवून थोडीशी केलेली वाटचाल असेच म्हटले पाहिजे.'' [२४]

## श्री.म.माटे :

माट्यांचे १९४१-५९ या कालखंडात एकूण सहा म्हणजेच 'उपेक्षितांचे अंतरंग' 'माणुसकीचा गहिवर', 'भावनेचा पाझर', 'अनामिका', 'भावनांची मांडणी', 'भावकथा' हे कथासंग्रह प्रसिद्ध झाले. त्यांच्या साहित्यात लेखनाचा कसदारपणा जाणवतो. ग्रामजीवनाकडे ते बाहेरूनच पहात नाहीत, तर आतून समरस होऊन लिहितात. त्यांच्या कथेतील कलात्मकतेचे हेच मुख्य कारण आहे. माटेंच्या लेखनात भावनेचा उमाळा व सूक्ष्म निरीक्षण आहे. त्यांच्या कथांना एक रसरशीत जिवंतपणा आला आहे. कोणताही समाजवाद, गांधीवाद त्यांनी मांडलेला नाही तसेच त्यांच्या कथा मनोरंजनापासून दूर आहेत. '' माटे यांनी १९१७ ते १९३७ या कालखंडात स्वत:ला अस्पृश्यता निवारण्याच्या कार्यात गुंतवून घेतले होते.''[२५] त्यातूनच त्यांनी प्रेरणा घेतली.

१९४१ साली 'उपेक्षितांचे अंतरंग' हे पुस्तक प्रकाशित झाले. त्यांच्या कथेत आजच्या दलित कथेची बिजे रूजलेली आहेत. यातील कथा ह्या अस्सल आहेत. जवळून

अनुभवलेले विश्व त्यांनी चित्रित केले. समाजातील उपेक्षित दीनदलितांच्या अपार जिव्हाळ्यातून त्या जीवनावर त्यांनी कथा लिहिल्या . त्यामुळे त्यांच्या लेखनात वास्तवता दिसून येते. हरिजनवस्तीत जाऊन त्यांच्या सुख- दु:खाचा प्रत्यक्ष अनुभव घेतला. 'कृष्णाकाठचा रामवंशी', 'मांगवाड्यातील संगाजीबोवा', 'खराटेवाली शेवंती', 'पुरंदरचा नामा', 'तारळखोऱ्यातील पिऱ्या' यांच्या व्यक्तिरेखातून सच्चेपणा आलेला दिसून येतो.

'बन्सीधर ! तू आता कुठे रे जाशील?' हा प्रश्न तर वाचकांच्या अंतकरणाचा वेध घेऊन जातो. हाच हृदयस्पर्शी जिव्हाळा त्यांच्या कथेत दिसून येतो. माडग्यांनी निवदनामध्ये वापरलेली सातारी बोली ही अतिशय वास्तव अशी आहे. '' पण तुमच्या पायाच्यान सांगतो. परमेसरानं एवढा राग का केलाया मजीवर? सांचीपारनं घराला परत फिरलो म्हंजी सडकनं येताना तुमच्या कडची बायामाणसं अनं बापयी फिरायला निगालेली दिसत्यात ती खुशीनं गोष्टी करतत्यात, हसत्यात, हवा खात्यात तवा माझ्या मनात येतं की आमचं जीन बगा काय मातीच्या मोलाचं, देवा चांडाळा, असं का केलंस?''[२६] अशा तऱ्हेने नेमकी आणि नेटकी भाषा वापरणारे हे पहिलेच ग्रामीण लेखक आपल्याला दिसून येतात. सहानुभूतीने त्या जीवनाचे चित्रण करण्याची जाणीव हीच त्यांच्या कथा लेखनाची मुख्य प्रेरणा दिसते.

दरोडे घालणारा पण अत्यंत प्रामाणिक ईश्वरनिष्ठ असलेल्या 'पिऱ्या मांग' गांजाचे व्यसन जडलेला अबोल ' तातूकाका', टोळ-धाडीने उद्ध्वस्त झालेला आपल्या शिवाराकडे पाहून धाव मोकलून रडणारा 'भिवा', मानव जातीत पहिल्या रस्त्यावर पाऊल टाकायलासुद्धा संधी न मिळालेला अस्पृश्य 'संगाजी' आणि धनलोभाने पोटची पोर बुरूजात देणारा, पण ऐनवेळी वात्सल्याच्या उमाळ्याने उर फुटून मेलेला 'बहिरनाक' इत्यादी व्यक्तिरेखा स्पष्ट करताना माडग्यानी चोऱ्या, दरोडे घालणारी, पण ती माणसेच आहेत याचे चित्रण केले. ती अशिक्षित असतील रांगडी असतील तरीही मायाळू आणि श्रद्धाळू आहेत हेच दाखवून दिले. ही माणसे जिवंत होऊनच आपल्यासमोर उभी राहतात त्यांच्या मनातील खळबळ आपल्याला जाणवू लागते. म्हणून आनंद यादव यांनी म्हटल्या प्रमाणे '' माडग्यांच्या कथेत 'कस' मोठा जीवनाची अर्थपूर्णता पाहण्याची कुवत

प्रतिभावंताची; म्हणूनच त्यांच्याकडे ग्रामीण कथेचे जनकत्व गेले.'' [२७]

माटे हे समाजसुधारक आहेत. वयाच्या पन्नाशीनंतर लेखन केले. ग्रामीण जीवनातील रांगडेपणा, साधेपणा, हजरजबाबीपणा, जिद्द हे सर्व प्रथम माठ्यांनी आपल्या कथेतून आणले. माठ्यांची शैली वास्तवाशी भीडणारी आणि दमदार अशी आहे. लांब सडक वाक्ये व रांगड्या ग्रामीण व्यक्तिरेखा यांचे साक्षात चित्रण आपल्यासमोर ठेवले. त्यांचे रसाळ निवेदन, ग्रामीण भाषा, समाजसुधारकाची कणव, पांढरपेशाची सामाजिक जाणीव त्यांच्या कथांतून दिसून येते. '' माठ्यांच्या लेखनातून कळत नकळत स्फूर्ती घेऊनच इतर ग्रामीण लेखक या क्षेत्रात उतरले म्हणूनच माटे यांनी 'ग्रामीण कथांचे अग्रदुत' अशी संज्ञा अंबादास माडगुळकर आणि सुर्यकांत खांडेकर यांनी दिलेली आहे.''[२८]

## श्री.ना.पेंडसे आणि गो.नी. दांडेकर:

पेंडसे आणि दांडेकर यांनी १९४५ या दरम्यान कथा कादंबऱ्यांच्या ग्रामीण जीवनाला काहीसा उजाळा दिला. पारंपारिक ग्रामीण जीवनातील नितळता, निर्भेळता, सच्चेपणा, मांगल्यात्रील व चांगुलपणावरील श्रद्धा, भव्य निसर्ग यांच्या साहचर्यात राहणारी रांगडी माणसे यांचे आटोपशीर चित्रण या कथाकारांनी केले.

विशेषत: दांडेकरानी नवे ते दिखाऊ जुने ते दिव्य म्हणजेच जुनं ते सोनं अशी उत्कट भमिका पत्करली. त्यांचा ध्येयवाद सुधारित खांडेकरी ध्येयवाद वाटतो. 'सरू सासरी जाते' या कथासंग्रहात दांडेकरांनी जुन्या संस्कृतीवरील श्रद्धा व जीवनमुल्यांची जोपासना यांचा प्रत्यय त्यांच्या कथांतून आपल्याला मिळतो. प्रा.पा.श्री.घारे यांच्या संदर्भात म्हणतात की, '' वाचकांचे चित्त आकर्षून घेऊन ते सतत कायम राखण्याचे सामर्थ्य त्यांच्या लेखणीत आहे.'' [२९]

## ग.ल.ठोकळ :

ग्रामीण जीवनातील चित्तथरारक अनुभव घेऊन यांच्या कथा वाचकासमोर येतात. 'कडू साखर' (१९४३) हा यांचा पहिला कथा संग्रह प्रसिद्ध झाला,

कोल्हाट्याच्या खेळाचे वर्णन 'गुंड्या' मधील गोफणीच्या लढाईचे वर्णन त्यांनी आपल्या चित्रमय शैलीने साक्षात उभे केले. खेडेगावातील अज्ञान, माणसामाणसातील हाडवैर, दादागिरी करणारे लोक, शेतीतील प्रसंग, खेडेगावातील सण, उत्सव इत्यादी त्यांनी कथांचे विषय केले. ग्रामीण जीवनातील व्यापक दर्शन त्यांच्या कथेतून घडते. त्यांच्या कथा घटनाप्रधान असून रंजक आहेत.

'ग्यानबाची मेख' मध्ये बापाच्या प्रेताचा अंगठा कापून तो एक लाखाच्या स्टॅम्पवर उठवण्याची योजना लेखकाने केली आहे. ग्रामीण जीवनाचा निकट परिचय असूनही त्या जीवनातील थरारक व भडक घटनावरच ठोकळांनी आपले लक्ष केंद्रीत केल्यामुळे त्यांची कथा घटनाप्रधान व मनोरंजकतेसाठी अवास्तवाचा आश्रय घेणारी अशी आहे.

ठोकळांच्या नंतरच्या कथा संग्रहातून ग्रामीण जीवनाची पार्श्वभूमी नाहिशी होऊन नागरी जीवनाकडे त्यांची दृष्टी वळलेली दिसते. मानवी मनाचा शोध घेण्यापेक्षा त्यांनी व्यक्तींच्या द्वारा नाट्यपूर्ण प्रसंगाचे चित्रण केले. घटना नाट्यपूर्ण करताना ते अद्‌भुताचा आधार घेतात. त्यांच्या निसर्ग व व्यक्तिवर्णनात काव्य, कल्पकता, रांगडेपणा या गोष्टी अधिक प्रमाणात दिसतात. आकर्षक प्रारंभ, घटनांची मन रमवणारी मालिका व चटकदार शेवट असा जणू फडके तंत्राचा अवलंब त्यांनी कथालेखनासाठी केल्याचे जाणवते. जीवनदर्शनापेक्षा मनोरंजनावर अधिक भर आहे. ग्रामीण भाषा, निरिक्षण आणि जिवंत व्यक्तिरेखा उभे करण्याचे सामर्थ्य त्यांच्या ग्रामीण कथांतूनच दिसते.

महाराष्ट्रातील ग्रामीण जीवनाच्या पार्श्वभूमीवर त्यांनी आपला अनुभव साकार केला आहे. तेथील ग्रामीण भाषा आणि ग्रामीण जीवनातील बारकावे त्यांनी सूक्ष्मपणे टिपले आहेत. हे त्यांच्या कथा अभ्यासतांना दिसून येते.

## र.वा.दिघे:

कोकणच्या निसर्गरम्य पार्श्वभूमीवरील जानपद समर्थपणे चित्रित करणारे र.वा.दिघे हे कुशल कथालेखक आहेत. त्यांच्या 'घरकुल' ते 'लक्ष्मीपूजन' पर्यंतच्या

कथासंग्रहातून त्यांची अद्‌भुततेची आवड दिसून येते. नागर तसेच ग्रामीण कथाही त्यांनी विपूल प्रमाणात लिहिल्या आहेत. हे सह्याद्रीच्या कुशीतल्या आणि समुद्राच्या किनाऱ्यावरच्या कोकणचे लेखक आहेत. त्यांच्या 'पावसाचे पाखरू', 'पुर्तता' यामधून त्यांनी नेमक्या लोकभाषेचाच उपयोग केलेला आहे. कोळीजीवनावर आधारलेली त्यांची 'वादळ' ही कथा चमत्कृतीचा व सांकेतिकतेचा हव्यास दाखवते. १९४० ते ४६ असा यांच्या लेखनाचा काळ आहे. 'दंडकारण्यातील रात्री' हा त्यांचा पहिला कथासंग्रह होय. हा १९४० मध्ये प्रसिद्ध झाला. निसर्गाची सूक्ष्म वर्णने दिघेंच्या कथांतून येतात. आपल्या कथांतून दिघ्यांनी लोककाव्ये, ओव्या व इतर कवितांचा वापर केला आहे. दुष्टांचा पराभव आणि सज्जनांचा जय चित्रित करणाऱ्या त्याच्य कथा सामान्य वाचकाला अंतर्मुख करतात. एकतानतेचे चित्रण केल्याने दिघ्यांच्या कथा अल्पगुणी मनावर ठसून जातात.

'ओझे व वझे', 'शिकार', 'आसरा' इत्यादी कथा दिघ्यांनी कोकणातील निसर्गरम्य खेड्याच्या पार्श्वभूमीवर उभ्या केल्या आहेत. त्यात त्यांनी अद्‌भूत, कल्पनारम्य गोष्टींवर भर दिला आहे. 'घरकुल' या कथेचा विषय आधुनिक आहे. स्वतंत्र्योत्तर काळात खेड्यातील जीवनात लेखकाला बोचलेल्या गोष्टी विशेषत: त्या ठिकाणचे दैन्य, दु:ख, 'कुळकायदा -गुळकायदा', 'लॉटरीचे तिकीट', 'हमीरहट्ट' इत्यादी कथांमधून मांडल्या आहेत. 'भाईची भाऊबीज' ही गरीबांच्या कळवळ्याविषयी लिहिलेली कथा आहे. 'पहिले बक्षीस' ही शेतकऱ्यांच्या आर्थिक असहाय्यतेचे चित्रण करणारी व 'वादळ' ही कोळ्यांच्या जीवनावरील कथा याही अशाच प्रकृतीच्या आहेत.

ग्रामीण जीवनातील वेधक वर्णन ठोकळांनी माटच्यांच्या तोडीचे केले आहे. प्रादेशिक जीवनाशी ते समरसलेले असल्यामुळे त्यातील उत्कटता व सहानुभूती अत्यंत उत्कटतेने त्यांच्या साहित्यातून दिसून येतात.

## चि.य.मराठे :

'गावरान गोष्टी' १९४६ हा यांचा पहिला कथासंग्रह होय. १९३० - ३१ पासून ते नियतकालीकांतून ते कथा लेखन करीत असायचे त्यांच्या या कथा घटनाप्रधान आहेत. 'सोय जाणेल तो सोयरा', 'गणू मास्तर व गणू रामोशी' या त्यांच्या कथाशीर्षकातही

नाट्यात्मकतेची जाणीव होते. दरोडेखोरीच्या जीवनाला कंटाळलेला 'डोंगरवाडीचा राजा' शेवटचा दरोडा घालायला जाऊन गोळीला बळी पडतो व ऐपतीबाहेरचा हुंडा देण्याचे कबूल केल्यावर लग्न वऱ्हाडाला परतीच्या मार्गावर लोटून रक्कम हिसकावणारा दाजीबा कुलकर्णी 'सोय जाणेल तो सोयरा' या कथेत जाणवते. पुण्याच्या अवतिभोवती मावळखोऱ्यात या घटना घडतात या विलक्षण घटना व नाट्यात्मकता यातून त्यांनी कथा फुलविण्याचा प्रयत्न केला आहे.

ग्रामीण वातावरण निर्मिती व शैलीतील वेधकता यांचे प्रत्ययकारी चित्रण त्यांच्या कथेतून दिसून येते. त्यांच्याबरोबरच वाचकांची करमणूक कुतूहलनिर्मिती व शेवटी त्याला धक्का देणे ही कलात्मकता मराठ्यांच्या कथालेखनात जाणवते. वाचकांना भावनाविवश करणे, नाट्यपूर्ण प्रसंगाची गुंफण करणे आणि प्रसंगाचे विस्ताराने वर्णन करणे यामुळे ग्रामीण जीवनानुभवांचे लक्षणिय असे चित्रण त्यांच्या लेखनात आढळत नाही. वास्तवाचे वर्णन ते इतके तपशीलवार करतात की त्यातला जिवंतपणा निघून जाऊन ती एक कंटाळवाणी जंत्री होते.

## वामन चोरघडे व द.र.कवठेकर:

यांनी नागर जीवनावर कथा लिहिल्या पण काही कथा ग्रामीण जीवनावर थोडक्यात मांडल्या. चोरघड्यांच्या कथांत नागर व ग्रामीण जीवनाचे मिश्रण आहे. चोरघडे हे ग्रामीण जीवनातील सुख दुःखात समरस होतात. त्यांच्या 'भाकरी', 'संस्कार', 'अंजली', 'हरीख', 'शैशवस्मृती', 'पायाला काटा जीवाला व्यथा', 'काचेची किमया', 'गोरी बायको या कथेतून ग्रामीणतेची वैशिष्ट्ये दिसून येतात '' त्यांनी आपल्या ग्रामीण कथांना वास्तवतेच्या पातळीवर नेले.'' [३०] म.ना. अदवंत म्हणतात. स्त्रियांच्या विविध भावभावना त्यांनी हळुवारपणे टिपल्या.

उद्ध्वस्तता, विक्षिप्तता, विकृत, निराश, नाठाळ, मुल्यविन्मुख असे विविधतापूर्ण किंवा अज्ञान, दारिद्र्य, पांरपारिकतेतील अवमानित नितीशुन्यता यांना या कथा धैर्याने सामोऱ्या जात नाहीत. ग्रामीण जीवनाच्या भेदक वास्तव चित्रणापासून त्यांच्या या कथा दूर एकांगी अशा आहेत. त्या ग्रामीण जीवनाचा शोध घेत नाहीत असे

दिसून येते. वामन चोरघडे यांच्या 'सुषमा हवन', 'यौवन', 'प्रस्ताव', 'पाथेय' इत्यादी कथासंग्रह आहेत. तर कवठेकरांच्या 'अंध अंधारी बैसले', 'कुंकवाचा करंडा', 'ते निर्दय नाहीत गं' अशा कथा पहायला भेटतात. यांच्या कथातून कौटुंबिक जिव्हाळा व कारूण्य आहे. अ.ना. देशपांडे यांच्या मते " कवठेकरांच्या कथांचे कलात्मक मोल कमी झाले आहे."[३१]

एकंदरीत कवठेकरांच्या कथेचा विचार करता कौटुंबिक क्षेत्र मर्यादेतील कारूण्यमिश्रित हळवेपणाने लेखन करणारे कथालेखक म्हणून त्यांचा उल्लेख करता येईल कारण कारूण्य हा त्यांच्या जिव्हाळयाचा विषय आहे.

## य.गो. जोशी :

य.गो.जोशी यांची कथा ग्रामीण जीवन चित्रणात भावनांचे विविध पदर उलगडत असतानाच वास्तवाचे भान राखते. यांचे कथासंग्रह 'नुनर्भेट भाग १ ते ७', 'राघोटच्यांचे दैवत', 'शेवग्याच्या शेंगा', 'वहिनीच्या बांगडया' हे आहेत. भावना उत्कृष्ट प्रकट करणारा गुण, सोपी प्रसादयुक्त व घरगुती थाटाची भाषा, मधूनमधून तत्वप्रतिपादनाचे फार चांगले साधलेले खटके, संसारातील मनुष्याचे संबंध पाहण्याची विशेषत: स्त्री-पुरूष संबध पाहण्याची ठरीव छापील नसलेली दृष्टी अशी केळकरांनी जोशींच्या कथेची वैशिष्ठ्ये वाखाणली आहेत.

'सुपारी', 'वहिनीच्या बांगडया', 'अन्न आणि अन्न', 'निकामी', 'घोडयाचे काय करतात?' या कथा त्यांच्या कौटुंबिक जीवनावरील आहेत. ह्या सगळया कथा लेखकानेस्वत:च्या आयुष्यातून उचलल्यामुळे या कथांपासून लेखक वेगळा काढता येत नाही. मग ते अशावेळी 'कर्ज फिटेल पण सावकार गमावला' अशी सुंदर कथा लिहितात. अशाप्रकारे घराबाहेरच्या विश्वातही त्यांच्या कौटुंबिक प्रेमाचे दर्शन दिसून येते.

## म.भा. भोसले :

यांनीही काही ग्रामीण कथा लिहिल्या आहेत. विविध प्रसंगाचे जोरसकपणे चित्रण करण्याचा त्यांचा प्रयत्न दिसून येतो. सातारा सांगलीकडील परिसर यांच्या

कथासंग्रहात येतो तेथील बोलीची अचुकतेने वापर केला आहे. ग्रामीण जीवनातील लहान सहान समस्यांची मांडणी व सुशिक्षितांची सामाजिक जाणीव ही दोन वैशिष्ठ्ये भोसलेंच्या कथांमध्ये आढळतात. त्यांच्या कथेत रसरशीत जिवंतपणा शोधावा लागतो. त्यांची कथा मराठी ग्रामीण कथेत आपला ठसा उमटू शकली नाही.

ग्रामीण जीवनावर निष्ठा ठेवून ग्रामीण कथा सातत्याने लिहिल्या आहेत. त्यांच्या कथा या एकपदरी झाल्या आहेत. त्यांची कथा ग्रामीण जीवनाशी प्रामाणिक असूनही कुठेही जोर घेत नाहीत. त्यामुळे त्यांच्या कथा पडल्यासारख्या वाटतात. त्यांची प्रेरणा ग्रामीण जीवन रेखाटत राहण्याची आहे. पण एवढ्याने साहित्य निर्माण होत नाही त्यांची कथा वाचक मनावर फारसा प्रभाव टाकू शकली नाही.

### ब) स्वातंत्र्य प्राप्तीनंतरचे ग्रामीण कथाकार :

### व्यंकटेश माडगुळकर :

माडगुळकरांपूर्वीच ग्रामीण जीवनाचे चित्रण अनेक मराठी कथाकारांनी केले. पण ग्रामीण जीवनाचे अस्सलपणे चित्रण करणारे समर्थ कथाकार म्हणून व्यंकटेश माडगुळकर यांचाच उल्लेख करावा लागतो. त्यांची पहिली कथा 'वडारवाडीच्या वस्तीत' ही असून ती १९४६ च्या दिवाळी अंकात प्रसिद्ध झाली. सतत नेटाने ग्रामीण कथांचे लेखन करणाऱ्या माडगुळरांनी माणदेशी वैराण माळावरील दैन्य, दु:ख, अज्ञान घेऊन 'माणदेशी माणसं' (१९४९) मध्ये चित्रित केला. त्यानंतर 'गावाकडच्या गोष्टी' (१९५१), 'हस्ताचा पाऊस'(१९५३), 'उंबरठा' (१९६०), 'काळी आई' (१९५३), 'जांभळीचे दिवस' (१९५६), 'वारी'(१९६७) इत्यादी कथासंग्रह लिहिले.

माडगुळकर ग्रामीण जीवनाकडे ग्रामीणांच्या दृष्टीतून पाहतात. म्हणूनच त्यांची कथा अस्सल ग्रामीण आहे. माणदेशीच्या मातीतच ती जणू उगवली आहे. माणदेशी जीवनाशी त्यांच्या कथा इतक्या एकरूप आहेत की तेथील माणसेच आपली गोष्ट वाचकाला सांगताहेत असे वाटते आणि त्यामुळेच त्यांची कथा जिवंत व समर्थ झाली आहे. करूणरस हा माडगुळकरांच्या कथेचा प्राण आहे तो या स्थायीभावातूनच आलेला

आहे. माडगुळकरांचे वैशिष्ठ्य म्हणजे ते पात्रांना स्वत:बरोबरच वाचकांचीही सहानभूती मिळवून देण्याचा प्रयत्न करतात. लहान सहान वाक्यात व नितयाच्या बोलीतील साध्या शब्दात एखाद्या घटनेचे, एखाद्या वस्तूचे किंवा गावाचे हुबेहुब चित्रण ते साकार करतात. या संदर्भात डॉ. आनंद यादव म्हणतात, ''आपणास आलेल्या समाजातील अनुभवांचं, पात्रप्रसंगाचं अलिप्तपणाने जे काही आकलन झालेलं असले ते साकार करतात. पात्रप्रसंगाचं अलिप्तपणाने जे काही आलन झालेलं असेल ते वस्तूनिष्ठ मांडावयचं, ही दृष्टी माडगुळकरांनी कथेला दिली.'' [३२]

माडगुळरांच्या भाषेला अलंकाराचीही आवड नाही. कथेची रचना, भाषा, निवेदनशैली त्यातली माणसे व कथाविषय या साऱ्यात अकृत्रिमता दिसून येते. भाषा साधी सोपी आहे. त्यांच्या निवेदन शैलीबद्दल गो.मा.पवार लिहितात, ''त्यांच्या कथेतील निवेदकाच्या दृष्टीकोनाने त्यांच्या लेखनाला आधुनिकतेचे वैशिष्ठ्य प्राप्त होते. त्यांचे निवेदन कधी भावनाविवश होत नाही. एवढेच नव्हे तर ते भावनाप्रधानतेनेही केलेले नसते. माडगुळकरांनी ज्या काळात कथात्मक साहित्यात त्यांच्या निवेदनातील भावना प्रकटीकरणावरील नियंत्रण एकंदरीत निवेदन शैलीत अपूर्व म्हणावे लागेल. १९६० नंतरच्या नव्या पिढीतील नव्या लेखकांना माडगुळकर जवळचे लेखक वाटतात त्याचे हे प्रमुख कारण म्हणावे लागेल.''[३३]

माडगुळकरांनी ग्रामीण चित्रण सुधारकाच्या तळमळीतून व साहित्यानुभूतीतून बाहेरच्या माणसांचे अथवा मध्यमवर्गीय दृष्टीने कथा लिहिली नाही तर खेडूतांच्या जीवनाशी एकरूप होऊन त्यांचे अस्सल जिवंत चित्रण केले आहे त्यामुळे प्रा.म.द.हातकणंगलेकर भारावून त्यांच्या कथांविषयी म्हणतात, ''एखाद्या सर्वसामान्य घरात अवतारी मुल जन्मावे तसा ग्रामीण कथेच्या वंशात माडगुळकरांचा जन्म आहे. ग्रामीण जीवनाच्या बारीक मोठ्या रक्त वाहिन्यातून त्यांचे सहृदय कलापूर्ण शहाणपण अदृष्यपणे वावरत असते.'' [३४]

माडगुळकरांच्या लेखनावर माटे यांच्या कथेची काहीशी छाप पडली आहे. माटे ज्याप्रमाणे 'बन्सीधर! तू आता कुठे रे जाशील?' असा प्रश्न विचारून निर्णय वाचकावर सोडतात. त्याचप्रमाणे माडगुळकरांच्या कथेतील शेवटचे वाक्य - 'आता या

मोमिनांच्या पोरांनी काय करावं?' असा प्रश्न विचारला आहे. ग्रामीण कथेची खरी सुरूवात माडगुळकरांच्या साहित्यातून झाली असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

## द.मा. मिरासदार :

मराठी ग्रामीण कथेतील विनोदी कथाकार म्हणून हे प्रसिद्ध असले तरी ग्रामीण जीवनातील दु:खाची जाणीव व निसर्ग यांचे रेखीव विलोभनिय असे चित्रण यांच्या कथेतून दिसून येते. मिरासदारांच्या कथेत माडगुळकरांच्यापेक्षाही अधिक विक्षिप्त माणसे दिसतात. धुर्त, कावेबाज, भित्रट, इरसाल बढाईखोर अशी नमुनेदार पात्रे त्यांच्या कथेत असतात. दारीद्रय हे ग्रामीण माणसाच्या पाचवीला पुजले आहे असे म्हटले जाते. दारिद्र्याचे चित्रण त्यांनी अत्यंत प्रभावीपणे केले आहे.

'विरंगुळा' या कथासंग्रहातीलल कथा 'विरंगुळा', 'पाऊस', 'भोग' , 'धोंड्याचा महिना', 'वाटमारी', 'गवत' या कथांतून दारिद्रयाने पिचलेल्या दु:खद जीवनाची गडद अनुभूती देऊन जातात. या निखळ ग्रामीण कथा आहेत त्यांच्या निवेदनात मधूनच ते ग्रामीण बोलीचा वापर करतात. वातावरणाशी जवळिक साधतात. मनोरंजन, हकिकत या जुन्या घाटाच्या कथांत नवा आशय भरून गोष्ट सांगण्याचा प्रयत्न असतो, त्यामुळे या कथेला खास रूप येते. वा.ल.कुलकर्णी 'मिरासदारी कथा' असे म्हणतात.

'कोणे एके काळी' किंवा 'नव्याण्णवबादची एक सफर' अशा विनोदाच्या अंगाने गंभीर आशय मांडणाऱ्या कथा त्यांनी लिहिल्या आहेत. पण त्यांच्या कथांची संख्या अगदी मोजकीच आहे. 'गुदगुल्या', 'माझ्या बापाची पेंड', 'गंमत गोष्टी'(विनोदी), 'चुटक्याच्या गोष्टी', 'माकडमेवा', 'पारितोषिक' असे त्यांचे कथासंग्रह आहेत.

## शंकर पाटील :

१९४९ मध्ये 'वसंत' मासिकाच्या अंकामध्ये 'रामाच्या पाऱ्यामंदी' ही फडके खांडेकर चौकटीची एक ग्रामीण कथा प्रकाशित झाली. माडगुळकरांच्या कथा माझ्या वाचनात आल्या म्हणून मी लिहू लागलो म्हणणारे शंकर पाटील स्वत:च्या कथा लिहू

लागले. त्यांच्या 'वळीव' (१९५८), 'धिंड', 'भेटीगाठी', 'ताजमहाल', 'सरपंच', 'ऊन', 'शंकर कथा' (१९८२) अशा अनेक कथा संग्रहांचे स्वागत वाचकांनी मोठ्या उत्साहाने केले.

माडगुळकर, शंकर पाटील, मिरासदार यांच्या कलात्मक लेखनाने ग्रामीण कथेला मराठी कथेच्या मुख्य प्रवाहात स्थान मिळवून दिले. खेड्यातील लोकांच्या अनुभवांना त्यांच्या विविध प्रकृतीसह अनेक पातळयांवरून व अनेक शैलीतून शब्दरूप देतात. पाटील हे प्रयोगशील कथाकार आहेत. पाटलांची निवेदनशैली ही कथनकाराची आहे ते खेड्याची गोष्ट सांगतात. 'धिंड' या अलिकडील विनोदी कथासंग्रहात पाटलांची वृत्ती मिस्कीलपणाची तसेच ते गप्पा चतुरपणे, खेळकरपणे रंगवून सांगतात. त्यामधील 'पाळणा', 'देशी उपाय', 'अडसर', 'तक्रार', 'तमाशा', 'येणार! येणार!' ह्या कथा विनोदी आहेत यामध्ये त्यांनी ग्रामीण जीवनाचे चित्रण केले आहे . पण विनोदात्मक आहे.

खेड्यातील सामाजिक जीवनापेक्षा खेड्यातील माणसांच्या मनाचा विचार त्यांनी अधिक केला. हेही मराठी ग्रामीण कथेला नवीनच होते. त्यांच्या या मानवी मनाच्या शोध घेण्याच्या वृत्तीबद्दल आनंद यादव म्हणतात, "शंकर पाटील मनुष्याच्या प्राथमिक संघर्षातून पुढे गेले आणि त्यांनी मानवी मनात बुडी मारली. नुसते ते मानवी मनाचे दर्शन घडवण्यापेक्षा मानवी मनाची गुंतागुंत, त्याची आंदोलने, त्यांचे अनेकविध पापुद्रे त्यांनी उकलून दाखविले." [३५]

पाटलांची कथा ही ग्रामीण संवेदना तिच्या अंतरंगात प्रवेशून टिपणारी आहे. व्यक्तींच्या उद्‌गारावरून भावनांची खळबळ थेट वाचकांच्या हृदयाला भिडणारी आहे. 'वेणा', 'सारवण', 'पात', 'आभाळ', 'पाहुणी', 'प्रतिक्षा' या कथांतून अंत:करणातील भावनांची खळबळ व गुंतागुंत हळूवारपणे चित्रित केली आहे. पाटलांनी एकूण ग्रामीण कथेचा दर्जा बराच उंचावला आहे. खेड्यांच्या साधनसामुग्रीवर त्यांनी कथा लिहिलेल्या आहेत. म्हणूनच या कथा ग्रामीण वाटतात.

सारांश शंकर पाटील यांची ग्रामीण कथा बहूरंगी , बहुढंगी असून मराठी ग्रामीण कथा वाङ्.मयाच्या समृध्दीला तिचे मौलिक योगदान लाभलेले आहे.

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

## रणजित देसाई:

ग्रामीण निसर्ग, लोकजीवन, ग्रामीण परिसर, विविध उत्सव, जत्रा, उरूस,व कालपर्यंत येणारे सणवार यांचे तसेच भटक्या जाती जमाती, पारंपारिक जीवन, खेड्यातील ब्राह्मण वर्ग या सर्वांचे वर्णन यांच्या कथांतून पहावयास मिळते. त्यांच्या कथांमध्ये तोचतोचपणा येत असल्यामुळे कथा कंटाळवाण्या वाटतात. तसेच त्यांच्या कथा वरवरच्या वाटतात. ते मराठी वाङ्.मयात स्वत:चे असे स्थान निर्माण करू शकले नाहीत.

'रूपमहल'(१९५२), 'कणव'(१९६०), 'जाण' (१९६२), 'कातळ'(१९६५),'मोरपंखी सावल्या' 'मधुमती' अशाप्रकारचे कथासंग्रह त्यांनी लिहिले. 'आहूती', 'मरण', 'कातळ' मधील कथांत कसलीही उत्कटता जाणवत नाही. त्यांची शैली ही डोळ्यात भरण्यासारखी आहे, पण कथा विश्व हे मर्यादितच आहे. 'चाकोरी' व 'रूप्याचे डोळे' यामध्ये कालपरत्वे बदलत्या ग्रामीण जीवनाची जाणीव करून देतात. त्यांच्या 'ग्रंथाली' या कथासंग्रहात पाच कथा आहेत. या ऐतिहासिक दिर्घकथा आहेत. ग्रामीण कथा आवडीने लिहूनही ते स्वत:चे स्थान निर्माण करू शकले नाहीत. त्यामुळे ते स्वत: सांगतात '' निसर्गकथा हा माझा आवडता विषय या कथांना हवं ते रूप अद्याप लाभलं नाही'' [३६] एकंदरीत त्यांची कथालेखनाची संथ गती, सतत प्रयोग न करत राहण्याची सुखवस्तूवृत्ती असल्यामुळे त्यांच्या कथा तितकेसे लक्ष वेधून घेत नाहीत. निवेदकाच्या भाषापेक्षा ते प्रसंग, व्यक्ती यातून खूप सुचविताना दिसतात.

## सरोजिनी बाबर :

इंदिरा संत, कमला फडके, शांता शेळके, स्नेहलता दसनुरकर या कथा लेखिकांच्या कथापेक्षा वेगळ्या जगात घेऊन जाणाऱ्या अशा सराजिनी बाबर यांच्या कथा आहेत. सर्वत्र स्त्री लेखिकांनी स्त्री जीवन कथेतून मांडले. त्याच प्रमाणे सरोजिनीनी सुद्धा स्त्री जीवनातील समस्या, तिच्या अपेक्षा, वर्तमानकालीन स्थिती ,तिच्या बदलत्या भावना यांचे वर्णन केले आहे. स्त्री जीवन हा त्यांच्या कथांचा केंद्रबिंदू आहे. त्यांच्या कथेत कधी शहरी तर कधी ग्रामीण रीतीरिवाज यांचे चित्रण आपल्याला दिसून येते.

सरोजिनींचा मुख्य अभ्यास विषय म्हणजे लोकवाङ्.मय. या लोकवाङ्.मया मुळेच त्या ग्रामीण जीवनाकडे आकर्षित झाल्या व त्यांच्या साहित्यात ग्रामीण जीवन येऊ लागले. 'डोंगरची मैना' मधील कथा यामध्ये ग्रामीण स्त्री जीवनाचे चित्रण, तिची सुख दु:खे, तिच्या समजुती व चालीरीती कथांतून प्रकट केल्या. त्यांच्या 'सटवाईची पावलं', 'नव्याची पुनव', 'रूणझुणत्या पाखरा', 'राधा गौळण', ' शंकर-सीताराम' अशा प्रकारच्या कथा आहेत. ग्रामीण कथा लिहिणाऱ्या या एकटय़ाच स्त्री लेखिका असाव्यात असे वाटते. त्यांच्या कथेत स्त्री-जीवनाविषयी सहानुभूती असली तरी स्वानुभव नाही म्हणून त्यांच्या कथा गुळगुळीत वाटायला लागतात.

## हमीद दलवाई :

हिंदू-मुस्लीम संबंधावर मोजक्या पण दमदार कथा लिहिल्या. महाराष्ट्रिय समाजातील भावनांना ते अत्यंत तटस्थपणे आणि कलात्मकतेने रेखाटतात. हमीद दलवाई, मधु मंगेश कर्णिक हे कोकण परिसर रंगविणारे ग्रामीण लेखक आहेत. प्रादेशिकतेचे काही दुवे येथे जुळतात. 'लाट' हा त्यांचा प्रसिद्ध कथासंग्रह आहे. यामध्ये ग्रामीण कथेतील अस्पृश्यांचे जीवन चित्रण मर्यादित आहे.

## शंकरराव खरात :

खरातांची ग्रामीण कथा इतर नवकथेपेक्षा वेगळी आहे. खरातांची भूमिका माडगूळकरांच्या सारखीच वाटते. त्यांची कथा ही समाजाच्या अध:स्तरावरील दलित समाजाचे प्रतिनिधिक चित्रण करणारी असून समाजातील उपेक्षित माणसे, त्यांचे उपेक्षित जीवन त्यांचे वास्तव चित्रण करणारे आहे. खेडय़ापाडय़ातून पसरलेल्या विविध मागासलेल्या जाती-जमातीतील अहोरात्र कष्ट करणाऱ्या दरिद्री लोकांची चित्रे त्यांनी अस्सलपणे समाजासमोर सादर केली.

'बारा बलुतेदार', 'तडीपार', 'दौंडी', 'टिटवीचा फेरा', 'गाव-शिव' इत्यादी कथासंग्रह त्यांनी लिहिले. अगदी अलिकडचा 'सांगावा' हा कथासंग्रह असून त्यातून त्यांनी ग्रामीण जीवनातील दलित, अस्पृश्य वर्गाची सुख दु:खे, त्यांच्या भावभावना, त्यांचे विचार, त्यांच्या श्रद्धा, अंधश्रद्धा, दारिद्रय इत्यादी जे पाहिले ते कथांतून सांगितले.

त्यांच्या कथेतील पात्रे व्यक्तिगत दु:खाबरोबरच सर्व जमातीची दु:खे, व्यथा व्यक्त करणारी असतात. यामध्ये वास्तव व सच्चा अविष्कार दिसून येतो.

'माया' या कथेत कुत्र्यासारख्या मुक प्राण्याच्या अंत:करणात देखील धन्याबद्दल किती प्रेम असते आणि त्यांना मायेने वाढविणाऱ्या दरिद्री वैदू सारख्या माणसाच्या मनात त्यांच्या बद्दल वात्सल्यभाव किती असतो या बद्दलचे चित्रण केले आहे. तर 'भानगड' ही कथा साधीच असली तरी ग्रामीण पातळीवरील प्रेमसंबंध, तेथील रोजगार करणारे जीवन, वयात आलेली मुलगी, आणि चाळ्या करणाऱ्यांच्याकडे केलेले दुर्लक्ष, कुचाळक्या करणारे आणि लोकलज्जेसाठी तिला झालेला त्रास यांचे सुंदर मार्मिक चित्रण केले आहे.

ग्रामीण भागातील अनाडी, अशिक्षित म्हणून उपेक्षित राहिलेल्या या लोकांना साधी माणूसकीसुद्धा दाखविली जात नाही पण हेच लोक मात्र निष्ठेने, प्रेमाने आणि नेकीने आपले काम करतात. वरिष्ठांच्या उपेक्षित वागण्यामुळे त्यांचे जीवन भरडून जाते. त्यांचे चित्रण त्यांनी आपल्या कथांद्वारे करून दिले.आपल्या समाजातील जीवन सुख दु:खे त्यांनी पाहिली जी अनुभवली त्याचे चित्रण त्यांनी कथेतून मांडले.

## रा.रं.बोराडे :

बोराडे हे मराठवाड्यातील ग्रामीणजीवनाचे रेखाटन करणारे कथाकार आहेत. ग्रामीण कथेच्या क्षेत्रात बोराडेंनी मोलाची कामगिरी केली. त्यांचा पहिलाच 'पेरणी' हा कथासंग्रह त्यांनी मराठवाड्याच्या मातीस अर्पण केला आहे. १९६० साली त्यांनी कथालेखनास प्रारंभ केला. मराठवाड्यातील शेतकी व ग्रामीण जीवन येथील बोलीभाषेसह त्यांनी लिहिले. प्रत्येकाची प्रेरणा आपापल्या कथेत रेखाटण्याचीच दिसते .त्याच प्रमाणे बोराडेंनी ग्रामीण जीवनातील दैन्य व कारूण्य कथेतून हेरले आहे.

'मळणी','नातीगोती','बोळवण', 'राखण' असे त्यांचे कथासंग्रह आहेत. ग्रामीण जीवनातील नातेसंबंधाचा वेध बोराडे अतिशय ताकदीने घेतात. त्यांच्या 'नातीगोती' या कथासंग्रहातील कथा या दृष्टीने अभ्यासऱ्या सारख्याच आहेत. माडगुळकरांच्या कथेच्या जवळची यांची कथा वाटते. यांच्या 'बोळवण' या

कथासंग्रहातील बारा कथांमधून ग्रामीण स्त्रियांची दु:खे साकार झाली आहेत. 'कळा' या कथेत मुक्या प्राण्यांच्या वेणांची व्याकुळता चित्रित केली आहे. तर राजगार या कथेत दिवसभर राबल्याशिवाय घरी संध्याकाळी अन्न मिळत नाही अशावेळी कोणीतरी बोलावेल म्हणून गावातून वेढा काढावा लागतो. तेव्हा त्यातील बालाजी गावात फिरत असताना मावस भाऊ आजारी असल्याचं कार्ड मिळतं, त्यावेळी त्याची बायको चार दिवसाच्या अन्नाची चिंता मिटली म्हणणारी व मुलासकट त्यांना पहायला जाण्याचा विचार करते. परंतू निरोप एकट्यानेच यावे असा येतो तेव्हा ती परत कधीतरी जाता येईल असा विचार करते. यामध्ये दारिद्रयामुळे व्यक्तीचे हाल कसे होतात याचे चित्रण केले आहे.

'खेळ' या कथेत वासनांचे दमन करणारी पतीविरहित तरूणी आहे, तर 'भेग' या कथेतील बाई आपला आपला नवरा वयस्कर दिसतोय, केस पिकलेला आणि चेहरा सुद्धा तजेलदार नाही. त्यामुळे ती त्याला आग्रहाने दूध देते की तो धष्टपुष्ट व्हावा म्हणून, लसणीची चटणी व कांदे खायला घालते की त्यामुळे त्याला वासना निर्माण होईल म्हणून, अशाप्रकारे बोराडेंच्या कथेत वासनेची अपरिहार्यता व मौलिकता जाणवते.

'नातीगोती' व 'बोळवण' या दोन्ही कथासंग्रहात मराठवाड्यातील ग्रामीण मनाची जागती जाण ठेऊन वातावरण निर्मितीतून समाजजीवनाचे अस्सल चित्रण घडवितात. त्यांच्या 'कायसुद्धा न्हायलं नाय!', 'ताण', 'खुण' या कथांतून ही अनपेक्षित कलाटणी दिसते. त्यामुळेच बोराड्यांच्या कथा लोकप्रिय होण्यामागे अशा कथांचा भागच अधिक आहे. विनोदी संवादाच्या माध्यमातून बोराडे आपला आशय कुशलपणे सांगत जातात. बोराडेंची कथा ही स्वस्थ व संथ वाटते. विविध माणसांच्या अंतरंगांचे तळ ती न्याहाळणारी आहे.

## उद्धव शेळके :

१९५८ पासून 'शिळानं अधिक आठ कथा', 'आसरा', 'वानगी', 'काथावली', 'संसर्ग', 'हिरवी झूळूक', 'गरिबाघरची लेक', 'घुसळण', 'किल्ली हरवते तेंव्हा', 'कडूनिंबाची सावली', 'बाबला', 'उमरखा कुलकर्णी', 'बिंदिया' इत्यादी कथासंग्रह प्रसिध्द आहेत. उद्धव शेळके यांच्या कथेत वैदर्भीय ग्रामीण जीवन, लोकाचार,

पारंपारिकता, दारिद्र्य, अज्ञान,विविध कौटुंबिक ताणतणाव यांचे विपूल प्रमाणात चित्रण येते. त्यासाठी ते वैदर्भीय ग्रामीण बोलीचा वापर करतात. ग्रामीण वाक्यप्रचार व म्हणी यातूनही कथासृष्टी संपन्न होते. वऱ्हाड हा एरव्ही एक समृद्ध प्रदेश परंतू समृध्दतेच्या छायेत खुरटलेल्या माणसांचे चित्रण शेळके यांनी आपल्या कथातून केले.

शेळके यांच्या 'शिळानं' कथासंग्रहात दारिद्र्याने गांजलेल्या माणसांच्या संसाराच्या विदारक कथा आल्या आहेत. 'लेकुरवाई' या कथेत आजराने गांजलेल्या खंगलेल्या पण आपल्यामागे मुलालेकरांचे कसे होईल या विचाराने धास्तावलेली एक लेकुरवाळी रंगवलेली आहे. पोट भरण्यासाठी नोकरीच्या आशेने गांव सोडून अमरावतीला आलेला व तेथे आल्यावर नोकरी न लागल्याने व सोबतच्या मित्राने फसविल्याने नाईलाजाने गावाला परतणारा मुलगा 'संगत' या कथेत दिसतो. 'अंतर' सारख्या कथेत ते वासनेची अपरिहार्य खळबळ जोरकसपणे मांडतात. 'बाबला' या कथेत वेश्येच्या जीवनाची कर्मकहाणी नि:संकोचपणे सांगतात. माझं एका पुरषानं भागत नाही या बाबलाच्या आत्मनिवेदनावरून कथानकाला ती आपल्याला सोडून का पळून आली ते कळते. 'वसुली' या कथेत मैनाचा नवरा जिवंत असताना तिचा विनायकाशी ओलेला संबंध शेळक्यांनी कुशलतेने चित्रित केला.

उद्धव शेळके यांच्या काही कथांतून वास्तवाची विविध रूपे चित्रित झाली आहेत. यांच्या 'संसर्ग' या निवडक कथांच्या संग्रहात वास्तवाचे चित्रण करणारी अनेक कथानके आली आहेत. गरोदर बायकोला साहेबाच्या ताटातील उष्टे मटन देऊन 'मर्दानगी' तोरा मिरविणारा रफी, सर्प चावल्याने रोग बरा होतो अशा कल्पनेने सर्पाकडे आलेला पण अखेर जीवनाच्या अभिलाशेने परत फिरलेला महारोगी डोमा अशी अनेक उदाहरणे शेळक्यांच्या कथेमध्ये दिसून येतात. शेळकेंचे आणखी एक वैशिष्ठ्य म्हणजे त्यानी प्रत्यक्ष निवेदनापेक्षा वऱ्हाडी भाषेतील संवादावर भर दिला आहे.

शेळकेंच्या कथाकृती साध्या, सरळ, प्रथमपुरूषी निवेदन व प्रसंगानुरूप मुक्त संवाद अशा आहेत. यांनी वऱ्हाडाच्या ग्रामीणत्वाचे तेथील लोकाचार व पारंपारिकतेच्या बारकाव्यासह व्यापक चित्रण केले. दारिद्र्य, अज्ञान, रूढीशरणता, दैवाधिनता,

नियतीशरणता यांनी सुस्तावलेली माणसे यातीलच काही क्रुरदुष्ट आहेत. याचे चित्रण शेळकेनी कथांत केले आहे.

## आनंद यादव :

अस्सल ग्रामीण मन चित्रित करण्याच्या प्रयत्नात 'खळाळ' हा पहिला कथासंग्रह १९६७ मध्ये प्रसिद्ध झाला. 'खळाळ' मधल्या कथांना ग्रामीण जीवन व त्या जीवनाशी संबधीत शेती, मोटबैल, पीकपाणी, ग्रामीण रीतीरीवाज, सणवार, संकेत यांचे चित्रण आले आहे. गावाकडच्या वस्तीत वाडल्यामुळे त्यांच्या जाणिवेत व अनुभवात ग्रामीण मातीचे हुंकार अविभाज्यपणे मिसळून गेलेले आहेत. सुरूवातीला ते कविता करत त्यानंतर ते कथेकडे वळले. सामाजिक वातावरण यादवांच्यात असते. यादवांच्या कथा वास्तव ठरतात. उदाहरणार्थ त्यांची 'मुद्दा' कथेतील काळोख्या रात्री तीन महिन्यांपूर्वी स्वत:च्या हाताने मालकाचे मेलेले मूल पुरलेला बांध उकरूनं मुद्दा शोधणारा नरसू. त्यांच्या कथेच्या आशयासी त्यांच्या व्यक्ती व घटना एकरूपलेल्या असतात. त्यांचे ग्रामीण मन नागरीकरणाचा स्पर्श न होऊ देण्याचा सतत प्रयत्न करते. घटना, प्रसंग, भाषा, पात्रांचे अंतरंग, अवतीभोवतीचे वातावरण, संस्कार हे कथाबंध आकारण्यास मदत करतात.

१९७० नंतर ग्रामीण साहित्याची चळवळ उभी राहिली. ग्रामीण साहित्याच्या चळवळीने वेगळी साहित्य संमेलने भरवून ग्रामीण साहित्यावर चर्चा विमर्श घडवून आणले. 'पाणभवरे' (१९८२) हा आत्मनिवेदनात्मक कथासंग्रह भुतकाळातील जीवनाच्या खाणाखुणा टिपारा आहे. या कथांतून मुख्यत: डोळयासमोर उभे राहते ते कोल्हापूरच्या अवतीभोवतीच्या ग्रामीण परिसरातील दारिद्रय व कष्टाळू माणसे येतात. 'स्पर्शकमळे', 'माळावरची मैना' यासारखे ग्रामीण कथासंग्रह त्यानी लिहिले आहेत.

यांच्या साहित्याबद्दल म.द.हातकणंगलेकर म्हणतात, '' आनंद यादव यांनी कथालेखनाला प्रारंभ केला तेंव्हा त्यांची बरीचशी काव्यरचना आलेली होती. कवीप्रवृत्तीचे ग्रामीण कथाकार असा पिंड बनला त्यांची ग्रामीण जीवनाची आत्मानुभूती, दीनदुबळयांबद्दलची कणव, मातीची ओढ हे सर्व गुण जातीवंत व कसदार होते.''[३७]

यादवांच्या कथांना अस्सल ग्रामीण बाज आहे. ग्रामीणत्वाचा अडाणीपणा, अविचारीपणा, व्यवहारीपणा, धुर्तपणा, दारिद्रय, त्रणिक राग लोभ यांच्या चमत्कारिक मिश्रणातून मानवी मनाच्या परिशीलनातून ही ग्रामीण कथासृष्टी निर्माण झाली आहे.

## मनोहर तल्हार :

वैदर्भीय ग्रामीण जीवनातील घटना प्रसंगातून प्रादेशिकता जोपासण्याचा प्रयत्न केला आहे. 'बुढीचं खोटलं' (१९५८), 'तोरेघ), 'गोरीमोरी'(१९६६) व 'नि:संग' (१९७८) असे एकुण चार कथासंग्रह पसिद्ध झाले. यामधील काही कथा मध्यमवर्गीय शहरी जीवनाच्या तर काही ग्रामीण मातीशी नाते राखणाऱ्या अशा आहेत. तल्हारांच्या ग्रामीण कथांत वास्तवाच्या खाणाखुणा स्पष्ट आहेत. मात्र ग्रामीण जीवनातील प्रगमनशील संवेदना समन्वित करताना त्यातील अथांगता व गहिरेपणा कथेतून उत्कटपणे जाणवत नाही.

## सखा कलाल :

यांचा 'ढग' हा पहिला कथासंग्रह १९७४ मध्ये प्रसिद्ध झाला. 'सांज' हा ग्रामचित्रणात्मक दुसरा कथासंग्रह होय. सखा कलालांचा पिंड स्वतंत्र मनोवृत्तीचा असून त्यांची कथा एकनिष्ठ आहे. त्यांच्या भाषेवर शंकर पाटलांच्या भाषेचा प्रभाव आहे. यांनीही कथानिवेदनासाठी नागरी व ग्रामीण भाषेचे मिश्रण केले आहे. 'ढग' या कथेत संयुक्त कुटुंब पद्धतीतील नित्याच्या भांडणाला कंटाळून विभक्त राहण्यासाठी निघालेल्या मुलाच्या मनाची तगमग हळूवारपणे टिपली. पण शेवटी पिता-पूत्राच्या रक्ताचे संबंध आटत नसतात. हा जोरकस संदेश ध्वनीत करून कथा संपुष्टात येते.

डॉ.रा.गो.चवरे लिहितात, ''ग्रामीण जीवनातील ग्रामीणत्व, नाट्यात्मकता, प्रक्षोब, चवचालपणा यांच्या आहारी न जाता अत्यंत सौम्यपणे, चित्रमय शैलीने चित्रित करणारे सखा कलाल एक कारूण्यमय वाट चोखाळताना त्यांच्या कथाविश्वात ग्रामीण जीवनातील दु:खेच अधिकतर जोपासली आहेत.''[३८]

## क) ग्रामीण कथाकारांची तिसरी पिढी :

### महादेव मोरे :

'दवना' हा महादेव मोरे यांचा कथासंग्रह यामध्ये प्रादेशिकतेची जाण देऊन जातात. त्यामधील 'डोनसं' ही दमदार कथा आहे. 'झुंज' मध्ये प्रादेशिक जीवनाचा एक जानता अनुभव आहे. 'इंगित' मध्ये ग्रामीण जीवनातील व्यथा वेदनांकडे अत्यंत गंभीरपणे पाहून कथा लिहिल्या आहेत. त्यांच्या कथेतून अवतरणाऱ्या माणसांविषयी त्यांनी स्वत:च म्हटले आहे की, ''खेड्यांच्या यांत्रिकीकरणामुळे ड्रायव्हर, क्लिनर, मेस्त्री लोकांची नवीन जात निर्माण झाली या लोकांच्या प्रसंग श्वापदासारख्या वासना वेश्यावर्गही आहे, वा वेश्यावर्गापाठोपाठ त्यांना सांभाळणाऱ्या 'घरवाल्या' त्यांचे दलाल, तसेच कायद्यातून पळवाट काढण्यासाठी त्यांनी ठेवलेल्या 'नामिनल' यजमान, पोलीस, वरचे आधिकारी आले असता त्यांच्यापुढे टाकण्यासाठी कडबा, वैरणीसारखा त्यांच्या केला जाणारा उपयोग हे सारे माझ्या कथा-कादंबऱ्यात आले.''[३९]

### चंद्रकांत शिंदे :

'डुल्सा' हा पहिला कथासंग्रह. 'चकवा', 'कोसळ', 'झळाया' हे त्यांचे कथासंग्रह. मराठवाड्याच्या ग्रामीण जीवनाला सामोऱ्या जाणाऱ्या आहेत. तेथील लोकजीवन संकेत जोपासण्यात यांच्या कथा धन्य होतात.

### चारूता सागर :

चारूता सागरांनी मोजकेच कथालेखन करून मराठी कथेवर आपला ठसा उमठविला आहे. त्यांच्या कथेत नाट्यात्मक बीज, मनोविश्लेशण व काव्यगर्भता यांचे सुंदर मिश्रण झाले आहे. त्यांनी कोल्हाटी, जोगणे, डोंबारी या दुर्लक्षित जमातीचे प्रत्यकारी चित्रण केले. या जमातीचे पारंपारिक रीतीरिवाज, धार्मिक अधिष्ठान आणि गतानुगतिकता याकडे सागर लक्ष वेधातात. त्यांच्या 'नागिन', 'मामाचा वाडा' या कथासंग्रहातून त्यांच्या लेखनसामर्थ्याचा प्रत्यय येतो.

## किसन चोपडे :

'तपासगी' (१९८२) या त्यांच्या कथासंग्रहात एकूण अकरा कथा आहेत. पण त्यातील सर्वच ग्रामीण जीवनाची जाण येते. या संग्रहाच्या मलपृष्ठावर " खेड्यापाड्यातील यास्थित्यंतराचे व स्थित्यंतरामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीचे चित्रण किसन चोपडे यांच्या कथांतून येते" [४०] असे रा.रं.बोराड यांनी विधान केले आहे. तरी या कथा ग्रामीण जीवनाच्या केवढा धावता गोषवारा देतात.

## बाबा पाटील :

यांच्या ग्रामीण कथांतून ग्रामीणतेचे चित्र रेखाटले आहे. 'एकूट', 'शहरातील काम', 'सहभोजन', 'रांजन' या कथांतून ग्रामीणता जोपासलेली आहे. ग्रामीण जीवनात निसर्गाच्या सानिध्यात कशी ओढाताण करत रहावे लागते याचे चित्रण त्यांनी केले आहे.

## ड) चौथ्या पिढीची ग्रामीण कथा :

'हजारी बेलपान' हा ग्रामीण जीवनविषयक पहिला कथासंग्रह. 'सुगरणचा खोपा' (१९८९), 'जावयाचं पोर'(१९९१), 'लेक भुईची' हा कथासंग्रह ग्रामीण कथापरंपरेत महत्त्वाचा आहे. अधिकाधिक वास्तव्य असणाऱ्या त्यांच्या कथेत मनोविश्लेषणावर भर देऊन स्त्री-दु:खाचा वेध घेतलेला आढळतो. ही स्त्री परिस्थितीने पिचलेली आहे. या दृष्टीने 'परायाची लेक' मधील केसर 'वटी' मधील मांगीन व वाड्यावरची मालकिन या व्यक्तिरेखा पाहण्यासारख्या आहेत.

## बाबाराव मुसळे :

बाबाराव मुसळे व सदानंद रेगे यांचे चौथ्या पिढीच्या ग्रामीण कथाकारांमध्ये स्थान लक्ष वेधून घेणारे आहे. यांची कथा वास्तवातली भेदकता अंतस्त्वासह हेरते. ग्रामीण बोली आणि लोकजीवनातील आरास यांची विलसते येथे दृग्गोचर होतात.

## नागनाथ कोत्तापल्ले :

'काफिला', 'कर्फ्यू आणि इतर कथा', 'संदर्भ', 'राजधानी', 'रक्त आणि पाऊस', 'कविची गोष्ट', 'देवाचे डोळे' असे कथासंग्रह कोत्तापल्ले यांनी लिहिले आहेत. कोत्तापल्ले हे एक महत्वाचे लेखक कविमनाचे पापुद्रे हळूवार उलगडून दाखविणारे समिक्षक आहेत. मानवी मनाशी असलेल्या अर्थपूर्ण नात्यातून नागनाथ कोत्तापल्ले यांची कथा फुलत जात असल्याने ती अनुकरणमुक्त आहे. म्हणूनच व्यक्तिगत मुल्यांचा आग्रह आणि वैचारिक अधिष्ठान असलेल्या या लेखकाला म्हणूनच जीवनाचे खरे आकलन, मानवी मनाचे खरेखुरे चित्रण 'कर्फ्यू आणि इतर कथा' व 'काफिला' या कथासंग्रहातील लेखनात दिसते. वास्तवाशी नाते जोडत असताना आत्मभान ठेवावे लागते याचा हल्ली सर्वांनाच विसर पडलेला दिसतो तसा विसर कोत्तापल्ले यांना पडला नाही.

ग्रामीण जीवनातील परंपरा, रूढी चालीरीती, विविध निष्ठा, वंशपरंपरागत वैर, निरागसपणा, रंगेलपणा, निवडणूका, राजकारण या सर्व गोष्टींचे चित्रण त्यांनी केले आहे. ग्रामीण लेखन करण्याची जिद्द ठेवून प्रयत्न करणाऱ्या लेखकात नागनाथ कोत्तापल्ले यांचे नाव येते.

प्रतिमा इंगोले यांच्याबरोबरच बाबा पाटील, सतीश तराळ, बाबाराव मुसळे, संतोष मुळावकर, अशोक मानकरी, सुरेश अकोटकर, वामन होवाळ असे अनेक कथाकार आपल्याला दिसून येतात. यांनी ग्रामीण जीवनातील चित्रण कथांतून मांडले.

अशाप्रकारे ग्रामीण कथेची वाटचाल निश्चितच विकासाच्या दृष्टीने होत असलेली दिसून येते. प्रत्येक कथाकारांनी ग्रामीण भागातील होत असलेले बदल, स्त्री जीवन, कौटुंबिक भांडणे, राजकारण, शिक्षणाचा प्रसार, सहकार क्षेत्राचा विकास, शहरे, खेडी यांच्यातील कमी होत जाणारे अंतर इत्यादी अनेक गोष्टीचे चित्रण त्यांनी ग्रामीण कादंबऱ्यातून मांडले आहे.

# सारांश

मराठी ग्रामीण कथेची सुरूवात हरीभाऊंच्या 'काळ तर मोठा कठीण आला' या कथेपासून झालेली दिसतो. वास्तववादी लेखन करण्याचा प्रयत्न हरिभाऊंनी प्रथम केलेला दिसतो. त्यानंतर वि.सी. गुर्जर, वि.स.सुखटणकर हे कथाकार दिसून येतात. सुखटणकरांची कथांतील तत्कालीन लेखनशैली इतर लेखकांपेक्षा वेगळी वाटते. १९२० नंतर गांधीवादाचा प्रभाव मराठी साहित्यावर झाला त्याचप्रमाणे त्यातील ग्रामीण वाड्.मयावर जास्त प्रभाव झाला. सुखटणकर, र.वा.दिघे, ग.ल.ठोकळ यांनीही काही ग्रामीण कथा लिहिल्या आहेत. मराठी ग्रामीण कथेत विशेष अशी भर घातली ती श्री.म.माटे यांनी 'उपेक्षितांचे अंतरंगा' तील दु:खाला वाचा फोडून !

१९४५ नंतर मराठी साहित्यात नवकथेचा उदय झाला. नवकथाकरांपैकी व्यंकटेश माडगुळकरे यांनी ग्रामीण साहित्यात महत्वाची भर घातली. 'माणदेशी माणसं' आणि 'गावाकडील गोष्टी' मधुन अस्सल ग्रामीण जीवन चित्रण रेखाटले. मानवी मनाचा सूक्ष्म वेध घेण्याचा प्रयत्न शंकर पाटील यांनी केला. 'वळीव', 'उन', 'भेटीगाठी' अशा कथासंग्रहातून मानवी मनाचे पापुद्रे उलगडून दाखविले आहेत. 'वेणा', 'वळीव', 'आतडं', 'चिंधी', 'घालमेल' अशा कथेतून ग्रामीण माणसांच्या जीवनाचा आकांत ऐकणारे शंकर पाटील आपल्या प्रतिमेचे खरेखुरे रूप प्रकट करताना दिसतात. द.मा.मिरासदारांनी ग्रामीण कथा लिहिली असली तरी तिची प्रेरणा विनोद हीच ठरते. याच काळात म.भा.भोसले, ग.दि.माडगुळकर, रणजित देसाई, सराजिनी बाबर यांनीही काही ग्रामीण कथालेखन केले आहे.

दलित लेखकानीही काही ग्रामीण कथा लिहिल्या आहेत यामध्ये अण्णाभाऊ साठे, शंकरराव खरात यांचा प्रामुख्याने उल्लेख करता येईल. 'धग' कादंबरीकार उद्धव शेळके यांनीही ग्रामीण कथा लिहिल्या त्यांच्या 'शिळान अधिक आठ कथा', 'वाणगी','गरीबाघरची लेक', 'कडुनिंबाची सावली' अशा अनेक कथासंग्रहातून वैदर्भीय जीवन चित्रित केले. ग्रामजीवनाशी जवळचं नात असणाऱ्या रा.रं.बोराडे यांनी ग्रामीण जीवनचित्रण करणारे कथालेखन मोठ्या प्रमाणात केले. 'मळणी', 'पेरण',

14368



A

'नातीगोती' असे त्यांचे कथासंग्रह आहेत. हमीद दलवाई यांनी हिंदू-मुस्लीम समाजावर मोजक्या परंतू दमदार कथा लिहिल्या.

आनंद यादवांनी ग्रामीण जीवनातील बहुजन समाज तसेच दुःख रीतीरिवाज, शेत, शेतकीसंबंधीत गोष्टींची चित्रणे केली आहेत. 'खळाळ' हा कथासंग्रह त्यादृष्टीने पाहता येईल. मनोहर तल्हार यांच्या काही कथा ग्रामीण मातीशी नाते सांगणाऱ्या आहेत. सखा कलाल यांच्या 'सांज' या कथासंग्रहात ग्रामीण जीवनाचे चित्रण येते. त्यांच्या 'गढूळ', 'सांज', 'कंदूरी', 'पंगत', 'वाटणी' या कथांचे चित्रण जिवंत आहे असे वाटते.

ग्रामीण कथाकारांच्या तिसऱ्या पिढीमध्ये प्रामुख्याने महादेव मोरे आणि चारूता सागर यांचा उल्लेख येतो. महादेव मोरे यांचा 'दवना' हा कथासंग्रह प्रादेशिकतेची जाणीव येते. त्यांच्या 'झुंज', 'इंगित' अशा कथेतून ग्रामीण वास्तव चित्रण येते. चारूता सागर यांच्या 'नागीन' या कथासंग्रहातून जातीजमातींचे प्रत्ययकारी चित्रण येते. या पिढीत चंद्रकांत शिंदे, किसन चोपडे, बाबा पाटील यांचाही नामोल्लेख करणे आवश्यक वाटते.

चौथ्या पिढीत नागनाथ कोत्तापल्ले, प्रतिमा इंगोले, बाबाराव मुसळे आणि सदानंद रेगे यांची नावे सांगता येतील. यामध्ये विशेष भर नागनाथ कोत्तापल्लेंच्या कथांतून जाणवते. 'काफिला', 'कर्फ्यू आणि इतर कथा', 'संदर्भ', 'देवाचे डोळे', 'राजधानी', 'रक्त आणि पाऊस' असे काही कथासंग्रह लिहिले. ग्रामीण साहित्याला व ग्रामीण साहित्यविषयक चळवळीला महाराष्ट्राच्या वाङ्.मयीन आणि सांस्कृतिक जीवनात अर्थपूर्ण स्थान लाभले आहे, ही अर्थपूर्णता लक्षांत घेऊन ग्रामीण साहित्याचा आस्थेने विचार करणारे डॉ. नागनाथ कोत्तापल्ले हे एक महत्वाचे लेखक आहेत.

## समारोप

अशाप्रकारे ग्रार्मीण जीवनातील कल्लोळ माजवणारे ज्वालाग्राही प्रश्न, सरळमार्गी जीवन जगु इच्छिणा-या माणसाला कोंडमारा परिस्थितीशी तोंड देत असणारा ग्रामीण मनुष्य, तेथील जीवन, निसर्ग इत्यादी अनेक गोष्टींचे दर्शन आपल्या साहित्यातून घडविले. खेडे, खेडयातील माणसे त्यांचे स्वभाव, तेथील चाली-रीती, रूढी, परंपरा, तेथील निसर्ग ग्रामीण साहित्यकारांनी अत्यंत वास्तव पातळीवर चित्रित केला. त्यासंदर्भात त्यांच्या कथेचे स्वरूप, प्रेरणा व वाटचाल आपण पाहिली. पुढील प्रकरणात नागनाथ कोत्तापल्ले यांच्या कथांतील 'आशयसूत्रे' पहावयाची आहेत.

# संदर्भ ग्रंथ


| | | |
|---|---|---|
| १) कोत्तापल्ले, नागनाथ | : | 'ग्रामीण साहित्य; स्वरूप आणि शोध'<br>मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे ३०<br>पृष्ठ क्र. ७ |
| २) यादव, आनंद | : | 'ग्रामीण साहित्य;स्वरूप आणि समस्या'<br>मेहता पब्लिशिंग हाऊस,<br>पृष्ठ क्र. ९ |
| ३) कुलकर्णी, मधु | : | 'महाराष्ट्र साहित्य पत्रिका'<br>पृष्ठ क्र. ४५ |
| ४) पवार, गो.मा. | : | 'साहित्यमूल्य आणि अभिरूची'<br>सांकेत प्रकाशन,<br>पहिली आवृत्ती, १९९४<br>पृष्ठ क्र. १९० |
| ५) अत्रे, त्रि.ना. | : | 'गावगाडा'<br>पृष्ठ क्र. १,२ |
| ६) यादव, आनंद | : | 'ग्रामीण साहित्य; स्वरूप आणि समस्या'<br>मेहता पब्लिशिंग हाऊस,<br>पृष्ठ क्र. १४ |
| ७) जोशी, प्र.न. | : | 'आदर्श मराठी शब्दकोश'<br>विदर्भ मराठवाडा बुक कंपनी, पुणे<br>द्वितिय आवृत्ती, १९८२<br>पृष्ठ क्र. १२६ |
| ८) फडके,ना.सी. | : | 'लघुकथा:मंत्र आणि तंत्र'<br>व्हीनस प्रकाशन, पुणे ४<br>प्रथम आवृत्ती, १९५२ |

पृष्ठ क्र. २७

9) Hudson, W.H. : ' An introduction to the study of literature'
(London; George G. Harrapand Company, 1915) Page No. 454

१०) कुलकर्णी, दा.वि. : मराठी कथा; स्वरूप आणि आस्वाद'
पुणे, १९७६
पृष्ठ क्र. ५४

११) तत्रैव : पृष्ठ क्र. ५८

१२) तत्रैव : पृष्ठ क्र. ५८

१३) तत्रैव : पृष्ठ क्र. ५९

१४) तत्रैव : पृष्ठ क्र. ५९

१५) गुप्त शांतीस्वरूप : साहित्यिक निबंध
अशोक प्रकाशन, दिल्ली, १९९०
पृष्ठ क्र. ३२०

१६) कुलकर्णी, दा. वि. : 'मराठी कथा; स्वरूप आणि आस्वाद'
पुणे, प्रथम आवृत्ती, १९७६
पृष्ठ क्र. २

१७) यादव, आनंद : 'ग्रामीण साहित्य; स्वरूप आणि समस्या'
मेहता पब्लिशिंग हाऊस,
पृष्ठ क्र. ६२

१८) तत्रैव : पृष्ठ क्र. ६३

१९) तत्रैव : पृष्ठ क्र. १७४

२०) पवार, गो.मा. : 'ग्रामीण संवेदनशीलता'
सकाळ (रविवार पुरवणी)
पुणे, १ ऑगस्ट १९८१
पृष्ठ. क्र.६

२१) कुलकर्णी, प.अ. : यादव आनंद संपादित 'मातीतलं मोती'
कुलकर्णी ग्रंथगार, पुणे
प्रथम आवृत्ती, १९७०
पृष्ठ क्र. ४

२२) नलगे,चंद्रकुमार(संपा.): 'दक्षिण महाराष्ट्र साहित्य पत्रिका'
कोल्हापूर, ऑ.-नो-डिसेंबर १९९१
पृष्ठ क्र. २७

२३) कुलकर्णी, प.अ. : यादव आनंद संपादित 'मातीतलं मोती'
कुलगर्णी ग्रंथगार, पुणे
प्रथम आवृत्ती, १९७०
पृष्ठ क्र. ५

२४) तत्रैव : पृष्ठ क्र. ६

२५) डॉ.पानतावणे,गंगाधर : 'युगवाणी' (त्रैमासिक)
जुलै - ऑगस्ट-सप्टें १९८६
पृष्ठ क्र. २७

२६) माटे, श्री.म. : 'उपेक्षितांचे अंतरंग' (कशाचा संसार)
पृष्ठ क्र. ८४

२७) यादव, आनंद : 'ग्रामीण साहित्य; स्वरूप आणि समस्या'
मेहता पब्लिशिंग हाऊस,पुणे
द्वितिय आवृत्ती १९८४
पृष्ठ क्र. १५

२८) माडगुळकर, अंबादास व खांडेकर,सुर्यकांत : 'मराठी ग्रामीण कथा' (प्रस्तावना)
लेखन वाचन भांडार, पुणे १९६७
पृष्ठ क्र. १३

२९) घारे, पां.श्री. : 'मराठी साहित्य दर्शन'(प्रस्तावना)
अनाथ विद्यार्थी गृह, पुणे २
प्रथम आवृत्ती १९६०

पृष्ठ.क्र. ४, ५

३०) अदवंत, म.ना. : 'मराठीतील काही कथाकार'
अनमोल प्रकाशन, पुणे
प्रथमआवृत्ती १९७०
पृष्ठ क्र. १४५

३१) देशपांडे, अ.ना. : 'आधुनिक मराठी वाङ्.मयाचा इतिहास'
भाग दुसरा, १९७०
पृष्ठ क्र. ४५५

३२) यादव, आनंद : 'खळाळ' (प्रा.द.ता.भोसले यांना दिलेल्या मुलाखतीतून)
मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे
द्वितिय आवृत्ती १९८४
पृष्ठ क्र. १९२

३३) पवार, गो.मा. (संपा.) : 'ओझ' (प्रस्तावना)
सांकेत प्रकाशन, औरंगाबाद
पहिली आवृत्ती, १९८७
पृष्ठ क्र. ३१

३४) प्रा. हातकणंगलेकर, म.द.: 'मराठी साहित्य; प्रेरणा व स्वरूप'
पवार, गो.मा. (संपा.) पृष्ठ क्र. ३११

३५) यादव, आनंद : 'ग्रामीण साहित्य; स्वरूप आणि समस्या'
मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे
द्वितिय आवृत्ती १९८४
पृष्ठ क्र. १९०

३६) ताम्हणे, प्रभाकर : 'ललित' (रणजित देसाई यांची मुलाखत.)
जुन १९७६
पृष्ठ क्र. १६

३७) प्रा. हातकणंगलेकर,म.द.: 'ग्रामीण कथा; रूप प्रवृत्ती आणि परिसर'
सुपर्ण प्रकाशन, पुणे १९८६
पृष्ठ क्र. ४६

३८) चवरे, रा.गो. : 'मराठी कथा; प्रवृत्ती आणि प्रवाह'
मराठी साहित्य परिषद, अमरावती
पृष्ठ क्र. ३०८

३९) प्रा.हातकणंगलेकर,म.द. : 'ग्रामीण साहित्य विशेषांक'
'महाराष्ट्र साहित्य पत्रिका' १९८०
पृष्ठ क्र. २१

४०) बोराडे, रा.रं. : 'तपासणी'(लेखक किसन चोपडे)
कथासंग्रह मलपृष्ठ वेष्टनावरील मजकूर.